05 TO 11 APRIL 2021 - Page 1 (CRIME SANDHYA):Layout 1 03/04/2021 9:26 PM Page 1

C M Y K

|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||

गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ९ अंक : १५ सोमवार दि. ०५ एप्रिल २०२१ ते रविवार दि. ११ एप्रिल २०२१ पाने : ८ किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड

## अन्नदात्या बळीराजाला कुणीच नाही वाली उरले शेतात जाऊन पोलिसाने शेतकऱ्याला बेदम मारले





देवणी/शकिल मनियार

कृषिप्रधान असलेल्या भारत देशात सध्या शेतकऱ्यांना कुणीच वाली उरलेला नाही. एकीकडे केंद्र सरकारने लादलेल्या कृषी कायद्याच्या विरोधात पंजाब, हरयाणा येथील शेतकरी दिल्लीच्या सीमेवर कडाक्याच्या थंडीत पोराबाळांसह धरणे आंदोलन करतोय. तर दुसरीकडे शाहू फुले आंबेडकरांच्या प्रगतीशील महाराष्ट्रात पोलिसच शेतात जावून शेतकऱ्याला गुराढोरांसारखे बडवायला लागलेत. ज्या महाराष्ट्रात सर्वाधिक कर्जबाजारी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्या ...पान ६ वर

## त्या जमिनीशी गंगाधर कोतवाड याचा काहीही संबंध नाही -पोलीस निरीक्षक

गंगाधर कोतवाड या शेतकऱ्याला पोलीस कर्मचारी रमेश कांबळे याने केलेल्या बेदम मारहाणी नंतर देवणी पोलिसांनी त्याची फिर्यादी नोंदवून घेतली नाही. या बाबत आमच्या प्रतिनिधीने देवणी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक चितांबर कामठेवाड यांच्याशी भ्रमणध्वनी वरून संपर्क साधला असता त्यांनी सांगितले कि आम्ही त्यांची फिर्याद नोंदवून घेणार होतो, पण त्यावेळी अन्य दोन फिर्यादींची क्रोस कम्प्लेंट घेण्याचे काम सुरु असल्यानी आम्ही कोतेवाड यांना थांबायला सांगितले. पण ते थांबले नाहीत. तसेच त्या जमिनीशी कोतेवाड यांचा काहीही संबंध नव्हता. कारण त्याने हे शेत या पूर्वीच दुसऱ्याला विकले होते. मात्र बिराजदार यांनी कोतेवाड याला दारू पाजून त्या शेतात पाठवले. त्यावेळी आमचा कर्मचारी तेथून जात होता. कोतेवाड यांना शिवीगाळ करताना पाहून तो थांबला व त्याने कोतेवाडला समजावण्याचा प्रयत्न केला. पण तो शिवी द्यायला लागला. तसेच त्याने हात उचलला. त्यामुळे आमच्या पोलिसाने त्याला काठी मारली. पण ती चूक असल्याचे आम्ही मान्य करतो. पण हा बिराजदार आणि व्यंकट शेखर यांचा वाद आहे आणि तो आम्ही सोडवला होता असे कोतेवाड यांनी सांगितले.

## सुरक्षा रक्षकांनी त्याला रंगेहाथ धरले भंगार चोणाऱ्या अनिकेतला ठार मारले

मुंबई/राजेंद्र वेदांते

मुंबई सारख्या महानगरात चोरी आणि लुटमार हे गुन्हे काही नवीन नाही. मात्र चोराला पकडल्यावर त्याला पोलिसांच्या ताब्यात देण्याऐवजी काही लोकं स्वतःच पोलीसासारखे वागून त्याला बेदम मारहाण करतात आणि त्यात त्या चोराचा जीवही जातो. मुंबईच्या पवई परिसरात मेट्रोचे भंगार चोरण्याच्या प्रयत्नात असलेल्या एका चोराला तिथल्या सुरक्षा रक्षकांनी पकडून इतके मारले कि त्यात त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलिसांनी आरोपी सुरक्षा रक्षकांना अटक केली आहे.

अनिकेत त्या दिवशी दिवसभर घरी परतला नव्हता. आता येईल, नंतर येईल, नेहमी उशीरा घरी परततो तसा उशीरा येईल म्हणून त्याची आईच्या मनात अनिकेत बद्दल रूखरूख सुरू झाली होती. कार्टा कुठे गेला असेल काय माहित असं म्हणत त्याच्या आई काळजीत पडली होती. काहीही कामधंदा करीत नसलेला १७ वर्षाचा अनिकेत रामा बनसोडे पवई येथील मिलिंदनगर परीसरात आपल्या आईबरोबर राहत होता.तो कधीही वेळेत घरी येत नसल्यामुळे त्याची आई जीवाला कंटाळली होती. ३१ मार्च उजाडला तरी तो घरी आला नव्हता.अखेर त्याच्या आईने त्याची शोधाशोध सुरू केली. त्याच्या आईने अनकेत बरोबर असणाऱ्या सर्व मित्रांना भेटून त्याची विचारपूस केली परंतु कुणालाच त्याचा पत्ता लागत नव्हता.आता मात्र त्याची आई घाबरली होती. काय करावे हेच तिला समजत नव्हते. तिची नजर फक्त आणि फक्त अनिकेतचा शोध घेत होती. परूंतू तो सापडत नव्हता.एका रात्रीत आपला मुलगा कुठे बेपत्ता झाला असेल याचाच ती विचार करत होती. तसा अनिकेतने असंगाशी संग केले होते. त्याचे मित्र वाममार्गाला लागलेले सराईत चोर होते. म्हणून त्याच्या आईला अनिकेतची काळजी वाटत होती. त्यात त्याचा थांगपत्ता कुठेच लागत नसल्याने अनिकेतच्या आईच्या काळजीत भर पडली होती. मुलाच्या विरहाने ती माऊली व्याकुळ झाली होती. कारण अनिकेत हा तिचा एकूलता एक मुलगा होता. तिचा ...पान २ वर

## पलंगाखाली लपून पतीने त्या दोघांचे चाळे पाहिले पत्नी जाताच बाथरुमला तिच्या याराला ठार मारले

बंगळुरू/क्राईम रिपोर्टर



आरोपी भरतकुमार

काही माणसे इतकी संयमी असतात कि त्यांचा सहसा मनावरचा ताबा ढळत नाही. मात्र त्यांच्या या संयमाखाली सुडाची आग धगधगत असते. पण पण संधी मिळेपर्यंत त्यांचा संयम सुटत नाही आणि जेंव्हा अशा माणसाचा संयम सुटतो तेंव्हा त्यांना कुणीही रोखू शकत नाही. बंगळूरू नजीकच्या बयादारहल्ली येथील एका सुताराच्या पत्नीचे दुसऱ्याशी अनैतिक संबंध होते. मात्र पत्नीला रंगेहात पकडून तिच्या याराला ठार मारण्यासाठी तो सहा तास पलंगाखाली लपून बसला. या सहा तासाच्या कालावधीत पत्नीचा यार मनसोक्त त्याच्या पत्नीला उपभोगत होता आणि हे सगळ पलंगाच्या खालून तो सहन करीत होता. पण त्याचा संयम सुटला नाही. मात्र पत्नी बाथरुमला जाताच तो पलंगाखालून बाहेर आला आणि त्याने पत्नीच्या याराला चाकूने भोसकून ठार मारले. असा प्रकार क्वचितच कुठे घडला असेल. कारण एखाद्याची पत्नी रस्त्यात दुसऱ्याशी बोलताना जरी दिसली तरी पती तिची धुलाई करतो आणि इथे तर पलंगाखालून सहा तास त्याने आपली पत्नी व त्याच्या याराची अय्याशी पाहिली, पण त्याचा संयम संपला नाही आणि संधी मिळताच त्याने या अनैतिक प्रकरणाचा शेवट केला. या प्रकरणी त्याच्या पत्नीच्या फिर्यादीवरून त्याला पोलिसांनी अटक केली आहे.

विनुथाचे आणि शिवराज याचे लग्नाअगोदरपासून एकमेकांवर प्रेम होते. परंतू काही कारणास्तव विनुथाचा विवाह गेल्या ८ वर्षापूर्वी भरतकुमार याच्याशी झाला होता. या दोघांचा ही संसार बहरत फुलत असताना या दोघांना दोन मुले झाली. भरतकुमार कारपेटंरचे काम करीत असल्याने त्याला कारपेटर भरतकुमार म्हणून ओळखले जायचे. तो दिवसभर आणि कधी तरी रात्र भरही आपल्या कामात व्यस्त राहत होता. या दरम्यान गेल्या एक दीड वर्षापूर्वी त्याची पत्नी विनुथा हिच्या नात्यातील एक तरूण त्याच्या घरी राहयला आला. त्याचे...पान २ वर

## वरातीतला धक्का प्राणावर बेतला वऱ्हाड्याने दारुड्याचा जीव घेतला

नाशिक/क्राईम रिपोर्टर



मयत मंदाकिणी

आजकाल शुल्लक शुल्लक गोष्टीवरून माणसाला इतका राग येतो कि रागाच्या भरात तो एखाद्याचा जीव घ्यायलाही मागे पुढे पाहत नाही. वरातीत नाचताना केवळ धक्का लागला यावरून झालेल्या भांडणाचा राग मनात ठेऊन एका इसमाने एका दारुड्याची हत्या केली. मात्र पोलिसांनी वरातीमध्ये नाचगाण्याचे जे शुटींग करण्यात आले होते, त्यावरून आरोपीचा छडा लावून त्याच्या मुसक्या आवळल्या.



राजेंद्र बागुल या तरुणास दारु पिण्याची भारी सवय होती. दारुचे पेग पोटात गेले म्हणजे तो जणू काही हवेत उडत असे. त्याच्या गळ्यातून पोटात उतरलेली दारु काही वेळातच वर चढत असे. ती दारु चढली म्हणजे राजेंद्र कुणाच्या ताब्यात रहात नसे. दारुच्या त्रासामुळे त्याच्या घरातील सर्वच सदस्य वैतागले होते. नाशिक जिल्ह्याच्या सुरगाना तालुक्यातील वांजुळपाडा या गावात राजेंद्र आपल्या परिवारासह रहात होता. रात्री बेरात्री कित्येकवेळा दारु पिल्यानंतर तो शेतातच झोपी जात असे. त्याच्या या सवयीची घरातील सर्व सदस्यांना कल्पना होती. त्यामुळे तो रात्री ...पान २ वर

## दारुच्या पार्टीत शुल्लक वाद झाला एका मजुराने दुसऱ्याचा खून केला

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी



मयत नितीन

दारूच्या पार्ट्या या नेहमीच मोठ्या वादाचे कारण बनतात. कारण दारूची नशा झाल्यावर पिणाऱ्याला शुद्ध राहत नाही आणि त्यातूनच हाणामारी होते. या हाणामारीत एखाद्याचा जीव जाण्याची हि शक्यात असते. सोलापूर जिल्ह्यातील शेळगी येथे अशीच घटना घडली आहे. मोल मजुरी करणारे दोन तरुण एका ठिकाणी दारू प्यायला बसले होते. दारूची नशा डोक्यात जाताच दोघांमध्ये वाद सुरु झाला. याच वादातून एकाने दुसऱ्याच्या डोक्यात दगड घालून त्याची हत्या केली. दरम्यान पोलिसांनी संशयित आरोपीला अटक केली असून त्याची चौकशी सुरु आहे. सदर हत्या अनैतिक संबंधातून झाल्याचा संशय आहे.

सोलापूर येथील शेळगी परिसरातील महालक्ष्मी नगराच्या पाठीमागे नागोबा मंदिर येथील मैदानात अनैतिक संबंधाच्या संशयातून युवकाचा डोक्यात बियरची बाटलीने आणि दगडाने मारून खून ...पान २ वर

## बलात्कार आणि हत्या होताच रक्ताचा सडा पडला पोलिसांच्या बेफिकिरीमुळे महिलेचा मृतदेह ही सडला

रायगड/क्राईम रिपोर्टर

महिलांवर अत्याचाराच्या घटना महाराष्ट्रात का वाढत आहेत याचे भयंकर उदाहरण रायगड जिल्ह्यातील खालापूर मध्ये समोर आले आहे. या ठिकाणी विटभट्टीवर काम करणाऱ्या एका ४२ वर्षाच्या महिलेवर बलात्कार करून तिचा खून करण्यात आला. पण घटनास्थळी सर्व पुरावे सापडूनही पोलिसांनी गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करून आरोपीला मदत केली. तर शवविच्छेदनासाठी ग्रामीण रुग्णालयात डॉक्टरच नव्हते. अखेर एका महिला कार्यकर्ती आणि अन्य दोन समाज सेवकांमुळे पोलिसांना गुन्हा दाखल करणे भाग पडले आणि पोलीस यंत्रणेच्या याच निष्काळजी आणि बेफिकिरीमुळे अशा घटनांना वाव मिळत असल्याचे दिसून येते. त्यामुळे बलात्कार व खुनाची फिर्याद नोंदवण्यास टाळाटाळ करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली आहे.





महिलांवरील अत्याचारानंतर त्याची दखलही घ्यायला सरकारी यंत्रणा कुचकामी ठरतात. अनेकदा तर असे गुन्हे दडपण्यासाठीही प्रयत्न होतात. अशीच एक धक्कादायक घटना रायगडमधील खालापूर तालुक्यात घडलीय. या ठिकाणी एका विटभट्टी कामगार असलेल्या आदिवासी कातकरी महिलेवर बलात्कार करुन तिची हत्या झाल्याची संतापजनक घटना घडली. विशेष म्हणजे या घटनेनंतर या प्रकरणाची तक्रार देण्यास गेलेल्या नातेवाईकांची तक्रार घेण्यासही पोलिसांकडून टाळाटाळ करण्यात आली. अखेर परिसरातील सामाजिक कार्यकर्ते सचिन आशा सुभाष आणि इतर ...पान ६ वर

## दुसऱ्या याराच्या मदतीने पहिल्याची हत्या केली चालू दमयंती व याराला जन्मठेपेची शिक्षा झाली

इचलकरंजी/क्राईम रिपोर्टर

शरीरसुख आणि पैशाला चटावलेल्या चालू बायका चमडी देऊन दमडी मिळवण्यात कधीच मागे नसतात. अशा बायकांना एकाच पुरुषात इन्ट्रेस्ट नसतो म्हणून त्या वेगवेगळ्या पुरुषांना आपल्या नादी लावून त्यांच्याकडून पैसा आणि शरीरसुख ओरबाडीत असतात. इचलकरंजी नजीकच्या भोणेमाल येथे राहणारी दमयंती सुद्धा अशीच होती. दोन मुले आणि पती असतानाही तिची जवानी नवी नवी शिकार शोधात होती. सुरवातीला तिने मालकाच्या मुलाला पटवले आणि नंतर दुसऱ्याच्या नादी लागली. पण तिच्या शरीराची चटक लागलेला मालकाचा मुलगा तिला सोडायला तयार नव्हता. त्यामुळे तिची एक फुल दो माली अशी अवस्था झाली. पण प्रेम असो कि अनैतिक संबंध एका म्यॅनात दोन तलवारी राहूच शकत नाही. म्हणून दमयंतीने दुसऱ्या याराच्या मदतीने आपल्या पहिल्या हिरोचा म्हणजे मालकाच्या मुलाचा काटा काढला. पण पोलिसांनी दोघांनाही पकडले. त्यानंतर या खटल्याची न्यायालयात सुनावणी होऊन न्यायालयाने दोघांनाही जन्मठेपेची शिक्षा ठोठावली.

इचलकरंजी येथील दमयंती यादव ही विवाहिता ...पान २ वर

## मायलेकीचे नाते कलंकित ठरले लेकीनेच आईला ठार मारले






अकोला/क्राईम रिपोर्टर

जन्मदात्या आईला आपल्या धर्म संस्कृतीत साक्षात देवता मानतात. कारण तिने ९ महिने मुलाला उदरात वाढवलेले असते. त्यानंतर त्याच्या जन्माच्या वेळी प्रसुतीच्या वेदना सोसलेल्या असतात. पुढे स्वतः हाल अपेष्ट सोसून त्याला लहानाचे मोठे करून शिक्षण देवून कर्तबगार बनवलेले असते. परंतु सध्याच्या जगातील मुलांना आईच्या याच उपकारांचा विसर पडलेला असतो. त्यामुळे आईच्या म्हातारपणी तिच्या आधाराची काठी बनण्याऐवजी मुले तिला यातना देतात. मुलगी आणि आई या मायलेकींच नातं तर खूप घट्ट असतं आणि मुला ऐवजी मुलीच आईचा आधार बनतात असे सांगितले जाते. पण प्रत्यक्षात तसे नसते. अकोला येथे तर एका मुलीनेच आपल्या जन्मदात्या आईची हत्या केली आणि आईचा अपघाती मृत्यू झाल्याचे भासवण्याचा प्रयत्न केला. पण पोलिसांनी तिचा डाव हाणून पडला आणि आरोपी मुलीला अटक केली. ...पान २ वर

## आर्थिक व्यवहारातून मोठा वाद झाला ओळखीच्या माणसाने फसवून खून केला

सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी



मयत रमेश

माणसाला एखाद्या गोष्टीचा राग आला कि तो कुठल्याही थराला जाऊ शकतो. अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे एका इसमाला गावातीलाच दुसऱ्या एकाने आपल्या सोबत येण्याचा आग्रह केला. पण तो त्याच्या सोबत गेला नाही. या गोष्टीचा त्याला इतका राग आला कि त्याने पाठोपाठ त्याचा घरी जावून त्याला आपल्या सोबत नेले आणि त्याची हत्या केली. या प्रकरणी आरोपीला अटक करण्यात आली असून हा खून आर्थिक वादातून झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

सोलापूर जिल्ह्यातील अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथे एका ४५ वर्षीय व्यक्तीचा दुपारी ४.०० वाजण्याच्या सुमारास अज्ञात कारणावरून खून झाला आहे. ही घटना शुक्रवार दि १९ रोजी घडली आहे. याबाबत रात्री उशीरा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्या विषयी पत्नी लक्ष्मी रमेश ...पान ६ वर

## लंपटपणा अजयच्या चांगलाच अंगाशी आला विवाहितेची छेड काढणारा जीवानिशी गेला



मयत अजय





आरोपी सचिन



आरोपी लक्ष्मण

कराड/क्राईम रिपोर्टर

काही लोकं इतके स्त्री लंपट असतात कि एखदी बाई त्यांना भाव देत नसली तरी ते तिच्या मागे लागतात आणि त्यांचा हाच लंपटपणा त्यांच्या विनाशाला कारणीभूत ठरतो. कराड नाजीकच्या आटके गावातील एक तरुण आपल्याच भावकीतल्या एका विवाहितेच्या मागे लागला होता. तिच्या पतीने त्याला समजावले तरी ऐकत नव्हता. त्यामुळे त्या विवाहितेच्या पतीने तिला माहेरी पाठवले. पण तिथेही तो जावून तिची छेड काढू लागला. तेंव्हा मात्र तिच्या पतीचा संयम सुटला आणि एकेदिवशी त्याने या लंपटाला रस्त्यात गाठून ठार मारले.

पुणे बेंगलोर राष्ट्रीय महामार्गावरील तीन किमीवर आटके हे गाव कराड पासून जवळच आहे. या गावातील बौध्द वस्तीत अजय अटके हा आपली आई आणि भावासह राहयला आहे. त्याचा भाऊ नागेश हा पेटींगचे काम करतो तर भाऊ अजय हा जे सी.बी ड्रायव्हर म्हणून काम करीत आहे. त्याची आई शोभा ...पान ६ वर

C M Y K

# मुस्ती येथे वाळू उपसा करणाऱ्यावर स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील मुस्ती येथील गावातील ओढयातून अवैध वाळू उपसा करणाऱ्यावर सोलापूर स्थानिक गुन्हे शाखेने कारवाई करून ४ ट्रॅक्टर, ४ डम्पींग ट्रॉली, ६ दुचाकी मोटार सायकलसह एकूण ३३ लाख ७५ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आली आहे. पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, सोलापूर ग्रामीण जिल्हयाचा पदभार स्विकारल्यानंतर जिल्हयातील अवैध धंदयाचा आढावा घेवून वाळू माफियांवर कडक कारवाई करणेबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना सुचना दिल्या होत्या.



त्याप्रमाणे सोलापूर जिल्हयात चोरून चालणारे अवैध वाळू उपसा व वाळू वाहतुकीवर कडक कारवाई करण्याकरीता पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांनी गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांची वेगवेगळी विशेष पथके तयार करून प्रभावी कारवाई करण्याबाबत सूचना दिल्या आहेत. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांना त्यांचे गोपनीय बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, मौजे मुस्ती ता. दक्षिण सोलापूर जि. सोलापूर गांवचे पूर्वेकडील ओढयातून काही इसम ट्रॅक्टर ट्रॉलीच्या सहाय्याने शासनाची परवानगी व रॉयल्टी नसताना चोरून वाळू काढत असल्याची बातमी मिळाली. पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांनी बातमी प्रमाणे कारवाई करणेकरता सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे व त्यांचे पथकास कारवाई करण्याकरीता आदेश दिले. त्यावरून सपोनि रवींद्र मांजरे व त्यांचे पथक मौजे मुस्ती ता. दक्षिण सोलापूर येथे जावून बातमी प्रमाणे खात्री केली असता, गांवचे पूर्वेकडील बाजूस ओढयालगत असलेल्या शेतामध्ये वाळूने भरलेल्या दोन ट्रॅक्टर, ट्रॉल्या व काही इसम हे मोटार सायकलीसह संशयीतरित्या दिसून आले. तेंव्हा आणखीन ट्रॅक्टर ट्रॉल्या सदर ठिकाणी येतात अगर कसे त्याकरीता काही वेळ दबा धरून बसले असता थोडया वेळानंतर आणखीन दोन ट्रॅक्टर ट्रॉल्या सदर ठिकाणी आल्यानंतर त्यांचे जवळ जावून ६ इसमांना जागीच पकडले व काहीजण अंधाराचा फायदा घेवून पळून गेले. त्यांचे ताब्यातून एकूण ४ ट्रॅक्टर, ४ डम्पींग ट्रॉली, ६ विविध कंपनीच्या मोटार सायकली, २ ब्रास वाळू, १० प्लास्टिकच्या टोपल्या, ५ खोऱ्या असे एकूण ३३ लाख ७५ हजार ५०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून एकूण ६ आरोपींना ताब्यात घेण्यात आले आहे. सदर बाबत वळसंग पोलीस ठाणे गुरंन १५२ / २०२१ भादंविकाक ३७९,३४ तसेच गौण खनिज कायदा १९७८ चे कलम ४ (१), ४ (क), (१) प्रमाणे फिर्याद वळसंग पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी ही सोलापूर ग्रामीण पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांचे नेतृत्वाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र मांजरे, सफौ. ख्वाजा मुजावर, पोलीस अंमलदार नारायण गोलेकर, धनाजी गाडे, मोहन मनसावाले, धनराज गायकवाड, अक्षय दळवी, चालक समीर शेख यांनी बजावली आहे.

## वाडा ग्रामीण रुग्णालय होणार १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय

**भिवंडी/आकाश गायकवाड**

वाडा ग्रामीण रुग्णालयात बेड वाढविण्याची वर्षानुवर्षाची ग्रामस्थांची मागणी अखेर पूर्ण झाली आहे. भिवंडीचे खासदार कपिल पाटील यांच्या प्रयत्नाने ३० बेडच्या ग्रामीण रुग्णालयाला १०० खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयाचा दर्जा देण्यात आला आहे. विशेष बाब म्हणून राज्य सरकारने हा निर्णय घेतल्याने ग्रामस्थांना दिलासा मिळाला आहे. पालघर जिल्ह्याच्या ग्रामीण भागातील वाडा हे महत्वाचे शहर आहे. या ठिकाणी अनेक वर्षापासून ३० बेडचे ग्रामीण रुग्णालय उभारण्यात आले होते. त्यात वाडा तालुक्याच्या शहरी व ग्रामीण भागाबरोबरच, विक्रमगड, कुडूस, अघई परिसरातील रुग्ण येत होते. मात्र, वाढत्या लोकसंख्येमुळे रुग्णालयाच्या प्रशासनाला मर्यादा येत होत्या. रुग्णालयातील बेडची क्षमता संपल्यानंतर रुग्णांना भिवंडी वा ठाणे येथे पाठविले जात होते. त्यात सामान्य रुग्णांना आर्थिक भूर्दड सोसावा लागत होता. या पार्श्वभूमीवर खासदार कपिल पाटील यांनी ग्रामीण रुग्णालयात बेड वाढविण्यासाठी पाठपुरावा सुरू केला होता. या रुग्णालयात १०० बेडची व्यवस्था करून रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करण्याची मागणी भिवंडीचे खासदार कपिल पाटील यांनी राज्याचे आरोग्य मंत्री राजेश टोपे यांच्याकडे ७ जानेवारी रोजी पत्रान्वये केली होती. त्यानंतर राज्य सरकारने नुकताच १०० खाटांचे उपजिल्हा रुग्णालय सुरू करण्याचा निर्णय घेतला. उपजिल्हा रुग्णालयासाठी जागा अधिग्रहीत करून तेथे इमारत उभारण्याबरोबरच नव्या पदांची निर्मिती लवकरच करण्यात येणार आहे, असे आरोग्य विभागाचे अवर सचिव संजीव धुरी यांनी काढलेल्या अध्यादेशात स्पष्ट करण्यात आले आहे. या निर्णयामुळे वाडा परिसरातील हजारो रुग्णांना दिलासा मिळाला आहे.

## अंबरनाथ येथील पोलिसाला ट्रकने चिरडले





**अंबरनाथ/प्रतिनिधी**

अंबरनाथ येथिल शिवाजी नगर पोलिस ठाण्याचे पोलिस यांचा ट्रक आणि मोटरसायकलच्या झालेल्या भीषण अपघातामध्ये जागीच मृत्यू झाला आहे. चंद्रकांत भागवत (५५) असे या पोलीस कर्मचाऱ्याचे नाव आहे. ते बदलापुर येथुन अंबरनाथ च्या दिशेने आपल्या मोटार सायकल वरुन येत होते. गुरुवारी (ता.१) संध्याकाळी ५.१५ वा.च्या सुमारास आनंदनगर एमआयडीसी रोड, पेट्रोल पंपजवळ हा अपघात झाला. बदलापूरला राहणारे चंद्रकांत भागवत बदलापूरहुन अंबरनाथच्या दिशेने येत असताना वैभव हॉटेल चौकात एका भरधाव ट्रकने भागवत यांच्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली. ट्रक चालकाचा ट्रकवरील ताबा सुटल्याने ट्रक थेट रस्त्यावरील दुभाजकाला धडक देत थेट भागवत यांच्या दुचाकीवर येऊन आदळला. या ट्रकने आणखी एका चार चाकी गाडीलाही धडक दिली. या अपघातात भागवत यांचा जागीच मृत्यू झाला तर चारचाकी गाडीमधील चालकाला किरकोळ दुखापत झाली. चंद्रकांत भागवत बदलापूरचे रहिवासी असून त्यांच्या या दुर्दैवी मृत्युबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## शेतघर जळाल्याने शेतकऱ्याला नुकसान भरपाई देण्याची मागणी



**भिवंडी/आकाश गायकवाड**

भिवंडी तालुक्यातील पडघा वडवली येथील शेतकरी रविंद्र दुंदाराम वारघडे यांचे शेतावर असलेले शेतघर पाच दिवसांपूर्वी शॉर्ट सर्किटमुळे अचानक आग लागून जलल्यामुळे मोठे नुकसान झाले आहे. सुदैवाने दुर्घटनेवेळी या घरात कोणी नसल्यामुळे जिवीत हानी टळली. मात्र या शेतघरात शेतीसाठी आवश्यक असणारी उपकरणे व एक पाण्याची मोटर जाळून खाक झाल्याने शेतकऱ्याचे मोठ्ठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वी रवींद्र वारघडे हे टोरंट पावर कंपनीकडे नवीन मिटर कनेक्शन मिळावे यासाठी मात्र त्यांच्या मागणीकडे कोणीही लक्ष दिले नसल्याने अखेर शॉर्ट सर्किटने आग लागून शेतघर जळाल्याचा आरोप शेतकऱ्यांनी केला असून शेतघर व शेतीचे साहित्य जळाल्याने शेतात लावलेली पिके देखील करपून गेली आहेत. या घर जाळल्याची व पिके कारपल्याचा मानसिक धक्का वारघडे यांना बसला असल्याने त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. सध्या त्यांची प्रकृती गंभीर असून त्यांना टोरंट पावर कंपनीकडून नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी वडवली गावच्या सरपंच करुणा संजय वारघडे यांनी केली आहे. विशेष म्हणजे मागील पाच दिवस वारंवार फेऱ्या मारल्या नंतर शुक्रवारी दुपारी टोरंट कंपनीचे कर्मचारी व अधिकारी यांनी घटनास्थळाची पाहणी करून पंचनामा केला असल्याची माहिती शिवसेना संपर्क प्रमुख संजय वारघडे यांनी दिली आहे.

## वाढदिवसाच्या दिवशी ओढवला मृत्यू

**भिवंडी/प्रतिनिधी**



धामणकर नाका अजंठा कंपाऊंड परिसरात राहणारे यादव समाजाचे राष्ट्रीय प्रवक्ता व पत्रकार सूरजपाल यादव यांच्या १८ वर्षीय रौनक यादव या मुलीचे अल्पशा आजाराने शुक्रवारी दुःखद निधन झाले आहे. आज तिचा वाढदिवस होता मात्र मुंबईतील रूग्णालयात उपचार घेत असतानाच तिचा मुत्यु झाल्याने यादव समाजात हळहळ व्यक्त केली जात आहे. रौनक सुरजपाल यादव (वय १८) ही इयत्ता १० मध्ये शिक्षण घेत होती. गेल्या काही दिवसापासून ती आजारी असल्याने तीला मुंबई येथील नायर हॉस्पिटल मध्ये उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. शुक्रवारी सकाळी उपचारा दरम्यान तिचा दुर्दैवी मृत्यू झाला.सायंकाळी साडेसहा वाजता तिच्या वर गौरीपाडा येथील हिंदु शांती स्मशानभूमीत शोकाकुल वातावरण अंत्यसंस्कार करण्यात आले.

## हैदोस घालणाऱ्या माकडाला पकडण्यात अखेर यश



**वाडा/प्रतिनिधी**

मागील अनेक दिवसांपासून वाडा शहरात अक्षरशः हौदोस घालणाऱ्या माकडाला पकडण्यात येथील पशुवैद्यकीय व वन विभागाच्या कर्मचाऱ्यांना अखेर यश आले आहे. तालुक्यातील शिरीष पाडा येथील एका शॉपिंग कॉम्प्लेक्समध्ये बुधवारी (दि.३१) सापळा रचून तालुका लघु पशुचिकित्सालय, वनविभाग वाडा आणि संजय गांधी राष्ट्रीय उद्यान बोरिवली या विभागांमधील कर्मचाऱ्यांनी संयुक्तपणे अथक प्रयत्न करून या माकडाला पकडण्यात यश मिळवले आहे. या माकडाला दूर जंगलात सोडून दिले जाईल असे वन अधिकाऱ्यांनी सांगितले. या कारवाईत पशुसंवर्धन विभागाचे सहाय्यक आयुक्त डॉ.शरद भोईर, डॉ. अमरसिंह पाटील, निखिल चौधरी, वनविभागाचे अधिकारी संभाजी पाटील व नॅशनल पार्क बोरिवलीची रेस्क्यू ऑपरेशन टीम यांनी सहभाग घेतला होता. गेले काही दिवस या माकडाने वाडा शहरात व परिसरातील गावांमध्ये मोठा उच्छाद मांडला होता. अनेकांना चावा घेतल्याने या माकडाला पकडण्याची नागरिकांनी नागरिकांन कडून होत होती.



## पाच जिल्ह्यातून मोटारसायकल चोरटा जेरबंद



**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर सह पाच जिल्ह्यामधून मोटारसायकल चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारांस स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने जेरबंद केले. पाच जिल्ह्यात चोरी केलेल्या दहा मोटारसायकल हस्तगत केल्या आहेत. नामदेव बबन चुनाडे (रा.पंढरपूर, जि.सोलापूर) असे मोटारसायकल चोरट्याचे नाव आहे. नामदेव याने जिल्ह्यातील बार्शी पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मोटारसायकल चोरली. त्यानंतर त्याने जिल्हा बाहेर जाऊन दौड, सातारा जिल्ह्यातील कोरेगाव, सांगली जिल्ह्यातील मिरज शहरातून तसेच नांदेड येथील शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतून मोटारसायकल चोरी केल्या आहेत. दरम्यान त्याने सातारा जिल्ह्यातील कराड शहरातून ही मोटारसायकल चोरली, मोटारसायकल चोराला पकडण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला पोलीस अधीक्षक तेजस्वी सातपुते, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे यांनी सूचना केल्या होत्या. त्या अनुषंगाने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केली त्यानंतर आरोपीने पाच जिल्ह्यात चोरी केलेल्या दहा मोटारसायकल पोलिसांनी जप्त केले आहेत.सदरची कामगिरी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सर्जेराव पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार राजेश गायकवाड, विजय भरले, सलीम बागवान, हरिदास पांढरे, रवी माने, सचिन गायकवाड, राहुल सुरवसे यांनी कारवाई केली आहे.

## कोरोनामुळे मृत्यू झालेल्या महापालिका कामगारांच्या कुटुंबाला दहा लाखांचा धनादेश प्रदान

**भिवंडी/अभिजित हिरे**

गेल्या वर्षी २०२० पासून संपूर्ण जगाला कोरोना महामारीने ग्रासले आहे. मात्र कोरोनावर नियंत्रण मिळविण्यात अद्यापतरी यश आलेले नाही. आजही कोरोनाचा कहर सुरू असून सरकारकडून सर्वतोपरी उपाययोजना करण्यात येत आहेत. भिवंडी शहरातील कोरोनाच्या लढ्यात महापालिका कर्मचारी पुष्पा माणिक पाटील यांचे निधन झाले होते. याची दखल घेऊन महापौर प्रतिभा विलास पाटील यांच्या निर्देशानुसार या कर्मचाऱ्याच्या वारसास दहा लाख रुपयाच्या निधीचा चेक देण्याची घोषणा केली होती. त्या अनुषंगाने आज त्यांच्या वारस श्रीमती कल्याणी पाटील यांना सभागृह नेते विकास निकम यांच्या हस्ते जकातनाका येथील महापालिका मुख्य कार्यालयातील त्यांच्या कार्यालयात दहा लाख रुपयांचा धनादेश प्रधान करण्यात आला आहे.



## थोडक्यात वृत्तांत

### डॉ.बाबासाहेब आंबेडकर अॅडव्होकेट्स फोरमच्या नूतन कार्यकारी मंडळाची निवड

लातूर : डॉ.बाबासाहेब आंबेडकर ऍडव्होकेट्स फोरमच्या बुधवार, दि.३१ मार्च २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत डॉ.बाबासाहेब आंबेडकर अॅडव्होकेट्स फोरमच्या नूतन कार्यकारी मंडळाची निवड करण्यात आली.त्यात अध्यक्षपदी अॅड. सुभेदार मारोती मादळे तर सचिव म्हणून अॅड.सुदर्शन मनोहर तांदळे यांची निवड झाली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर अॅडव्होकेट्स फोरमचे मावळते अध्यक्ष अॅड.नवनाथ अडसुळे यांच्या अध्यक्षतेखाली, पत्रकार भवन, लातूर येथे झालेल्या फोरमच्या या वार्षिक सर्वसाधारण सभेत नूतन कार्यकारी निवडण्यात आली, त्यामध्ये अध्यक्ष-अॅड.सुभेदार मादळे,सचिव अॅड.सुदर्शन तांदळे, उपाध्यक्ष -अॅड.उमाकांत राऊत, महिला उपाध्यक्षा- अॅड. सुरेखा श्रंगारे, सहसचिव-अॅड.उध्दव कांबळे, महिला सहसचिव -अॅड. अरुणा वाघमारे, कोषाध्यक्षअॅड.रोहित सोमवंशी, सदस्य- अॅड. राजकुमार गंडले, अॅड.नवनाथ आडसुळे,अॅड.सूर्यकांत लामतूरे, अॅड.लहू सुरवसे यांचा समावेश आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून अॅड.राजकुमार गंडले यांनी काम पाहिले, त्यांना अॅड.दिपक साठे यांनी सहकार्य केले.नूतन पदाधिकार्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. अध्यक्ष अॅड.मादळे व सचिव अॅड.तांदळे यांनी फोरमने टाकलेली जबाबदारी निष्ठेने पार पाडू अशी ग्वाही दिली.

### माजी सनिकांसाठी पुणे येथे सैन्य भरती

लातूर : जिल्ह्यातील माजी सैनिकांकरीता १३६ इन्फंन्ट्री बटालियन (प्रादेशिक सेना) ईको महार तर्फे बी. ई. जी. सेंटर, दिघी, पुणे येथे सैनिक जी. डी/ट्रेड्स मॅन या पदाकरीता दिनांक ०५ एप्रिल २०२१ ते ०७ एप्रिल२०२१ दरम्यान भरतीचे आयोजन करण्यात आले आहे. पात्रता - माजी सैनिक (हवलदार किंवा त्याखालिल पदावरुन निवृत्त), वयोमर्यादा - हवलदार ४५ वर्षे पर्यंत, हवलदारा खालिल पदासाठी ४२ वर्षा पर्यंत. पात्र माजी सैनिकांनी डिसचार्ज बूक, पीपीओ, शैक्षणिक दाखले, डोमिसाईल, फोटोग्राफ इत्यादी कागदपत्रे सोबत ठेवावेत असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी विजयकुमार ढगे यांनी प्रसिध्दी पत्रकाव्दारे केले आहे.

### नवीन शिष्यवृत्ती अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ

लातूर : जिल्हयातील सर्व शासनमान्यता प्राप्त अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित महाविद्यालयाचे प्राचार्य व या महाविद्यालयामध्ये प्रवेश घेतलेल्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांनी सन २०२०-२१ या वर्षासाठी भारत सरकार शिष्यवृत्ती (GOI) व शिक्षण शुल्क परीक्षा शुल्क (FREESHIP), राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यावसायिक पाठयक्रमांशी संलग्न असलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मंजूर योजनेचे अर्ज भरण्यासाठी महाडिबीटी हे पोर्टल दिनांक ३ डिसेंबर २०२० पासून सुरु करण्यात आले आहे. जिल्हयातील सर्व विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती चे अर्ज अचूक भरुन मंजूरीसाठी महाविद्यालय लॉगीनवर पाठवावे. महाविद्यालयाचे शिष्यवृत्तीचे काम पाहणारे कर्मचारी व प्राचार्य यांनी अर्जाची अचूक पडताळणी करुन मंजूरीस्तव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर कार्यालयास दिनांक १५ एप्रिल २०२१ पर्यंत ऑनलाईन सादर करावेत असे आवाहन सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, लातूर यांनी केले आहे.

### माहिती संचालकपदी गणेश रामदासी

लातूर : माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक म्हणून श्री. गणेश श्रीधर रामदासी यांची पदोन्नती झाली आहे. मंत्रालयात संचालक (प्रशासन व तांत्रिक कक्ष) या पदावर त्यांची पदस्थापना करण्यात आली आहे. रामदासी हे यापूर्वी मराठवाडा विभागाचे माहिती संचालक म्हणून कार्यरत होते. महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे २००१ मध्ये उपसंचालकपदी निवड झाल्यानंतर त्यांची प्रथम नियुक्ती दिल्ली येथील महाराष्ट्र परिचय केंद्राचे प्रमुखपदी झाली होती. केंद्रशासनात प्रतिनियुक्तीवर असताना माजी केंद्रिय राज्यमंत्री तारिक अन्वर तसेच माहिती व प्रसारण मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांच्यासोबत काम करण्याची त्यांना संधी लाभली होती. प्रसारभारतीमध्ये संचालक (प्रशासन) या पदावर त्यांची केंद्रशासनामध्ये सुमारे चार वर्षे प्रतिनियुक्ती होती.

### कोपरा प्रकरणी कुटुंबाला संरक्षणाची मागणी

लातूर : लातूर जिल्ह्यातील अहमदपूर तालुक्यातील कोपरा इथल्या पीडित मुलीला तात्काळ न्याय द्यावा व कुटुंबाला संरक्षण द्यावे अशी मागणी मराठा क्रांती ठोक मोर्चाचे राज्य समन्वयक अमित घाडगे पाटील यांनी केली आहे. मराठा क्रांती ठोक मोर्चाचे राज्य समन्वयक अमित घाडगे पाटील व अन्य कार्यकर्ते आज लातूर येथील शासकीय रुग्णालयात पीडित मुलीची भेट घेतली आहे त्यानंतर पत्रकारांशी बोलताना राज्य समन्वयक अमित घाडगे पाटील यांनी माँ साहेब जिजाऊ अहिल्याबाई होळकर सावित्रीबाई फुले यांच्या महाराष्ट्रत महिला व मुलीवर अत्याचार होत आहेत हे सहन केले जाणार नाहीत कोपरा इथल्या गरीब मुलीवर व असह्य मुलीवर व कुटुंबातील सदस्यांवर खोट्या केसेस केल्या आहेत या तात्काळ रद्द कराव्यात पीडित मुलगी व कुटुंबाला संरक्षण द्यावे शासनाने सदरच्या पीडितेची पुनर्वसन करावे अशी मागणी मराठा क्रांति ठोक मोर्चाचे राज्य समन्वयक अमित घाडगे पाटील यांनी केले.

### ऑल इंडिया बार कौन्सिल परिक्षेत अॅड.उदय दाभाडे उतीर्ण

लातूर : शहरातील एलआयसी कॉलनी भागातील रहिवाशी अॅड.उदय उर्फे राजकुमार आण्णासाहेब दाभाडे हे पंधरावी ऑल इंडिया बार कौन्सिल परिक्षा उतीर्ण झाले आहेत. दिनांक २४ जानेवारी २०२१ रोजी बार कॉन्सील ऑफ इंडिया ने सदरील परिक्षा घेतली होती. या परिक्षेचे परिक्षाकेंद्र नांदेड येथे होते. सदरील परिक्षा उतीर्ण झालेल्या उमेदवरांना सर्टीफिकेट ऑफ प्रॅक्टीस हे प्रमाणपत्र दिले जाते. न्यायालयात प्रॅक्टीस करण्यासाठी बार कॉन्सील ऑफ इंडिया ने हे प्रमाणपत्र अनिवार्य केली आहे. या परिक्षेत उतीर्ण होणार्यास विधी क्षेत्रात संपुर्ण भारता मध्ये प्रॅक्टीस करता येती. अत्यंत महत्वपूर्ण परिक्षा उतीर्ण झाल्याबददल त्यांचे विविध स्तरातून अभिनंदन होत आहे.

साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com

# सोशल मीडिया अश्लिलतेच्या विळख्यात!

सोशल मीडिया हा एक असा प्लॅटफॉर्म आहे ज्यावरून समाज जोडण्याचे, समाजाला दिशा देण्याचे आणि समाजातील प्रत्येक घटकाला एक दुसऱ्याकडून मदत होईल यासाठी एक मोठी साखळी निर्माण करण्याचे काम करतो. त्याचबरोबर सोशल मीडियाने जगाला इतकं जवळ आणले आहे की साता समुद्रपलिकडचा माणूसही आपला झाला आहे. जात, पात, भाषा, प्रांत, देश या सगळ्याच्या पलीकडे पाहण्यास सोशल मीडियाने शिकवले होते. पण दुर्दैवाने चांगल्या गोष्टींचा दुरुपयोग करणाऱ्यांची संख्याही मोठी असते. त्यामुळे सध्या सोशल मीडियाचा सुद्धा असाच दुरुपयोग केला जात आहे. त्यामुळे सोशल मीडियाचा हा दुरुपयोग थांबवण्यासाठी समाजातील चांगल्या लोकांनी पुढे येवून जागते रहो अशी हाक देऊन सोशल मीडियाचा दुरुपयोग करणाऱ्यांच्या विरोधात एक मोठी सामाजिक आघाडी उघडण्याची गरज आहे. कारण जे चांगल आहे, जे समाजाच्या हिताचे आहे, त्याचा चांगुलपणा आणि विश्वासाहर्ता टिकून राहायला हवा. तरच समाजाचं आरोग्य आणि नीतिमत्ता टिकून राहील. सध्या फेसबुक आणि व्हॉट्सॲपवर अश्लीलतेचा नंगा नाच सुरु आहे आणि त्याला प्रतिसाद ही प्रचंड मिळत आहे. फेसबुकवर मुलींच्या नावाने अकाऊंट उघडून चांगल्या मुलांना नादी लावण्यासाठी अश्लील फोटो, कथा आणि मॅसेज पोस्ट केले जातात आणि या फेक अकाऊंटच्या जाळ्यात अडकून अनेक तरुण आणि वयोवृध्द सुद्धा पागल झाले आहेत. खरे तर ही एक विकृती आहे. अशा विकृती बाबत ज्या तज्ज्ञांनी शास्त्रीय विश्लेषण केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार ज्या पुरुषांच्या लैंगिक भावना बोथट झालेल्या असतात अशा लोकांमध्ये महिलांच्या फिलिंग यायला लागतात आणि त्यांच्यात निर्माण झालेल्या याच विकृती ते लोक फेसबुकच्या माध्यमातून फेक अकाऊंट बनवून एखाद्याला जाळ्यात ओढून पूर्ण करीत असतात. पण त्याचे दुष्परिणाम असे होतात की आजकाल शाळकरी मुले अशा विकृतीला बळी पडत आहेत आणि त्यातून त्यांचे शैक्षणिक भवितव्य धोक्यात येत आहे. वास्तविक फेसबुकच्या माध्यमातून कला, साहित्य, व्यापार, सामाजिक संस्था यातील लोकांची मैत्री होते आणि त्यातून चांगल्या विचारांची देवाणघेवाण होते. चांगली माणसे एकमेकांशी जोडली जातात आणि त्यांचे चांगले ग्रुप तयार होऊन त्या ग्रुपच्या माध्यमातून चांगली विधायक कार्य हाती घेतली जातात. पण आजकाल चांगल्या लोकांपेक्षा फेसबुकवर वाईट लोकांचाच जास्त वावर सुरू आहे आणि त्यांच्याकडून लोकांची फसवणूक सुरू आहे. फेसबुकवरच्या मित्रांनी अनेक तरुणींचे आयुष्य उध्वस्त केलेलं आहे. त्यातून फसवल्या गेलेल्या कित्येक महिलांनी आत्महत्या केल्या आहेत. फेसबुकवर मैत्री झाली की एकमेकांचे नंबर घेऊन व्हॉट्सॲपवर चॅटींग सुरू होते. सुरवातीला नॉर्मल विषयावर सुरू असलेली चॅटिंग पुढे अश्लीलतेचा वळते आणि त्यानंतर सुरू झालेल्या व्हिडिओ चॅटिंगद्वारे एकमेकांचे अंगप्रदर्शन करून लैंगिक भावना चालवल्या जातात. रात्रीच्या वेळी बंद खोलीत अभ्यास करण्याच्या बहाण्याने कित्येक मुले-मुली आपल्या मित्र मैत्रिणी सोबत कॉम्प्युटर किंवा लॅपटॉप अथवा मोबाईलवर हाच अश्लीलतेचा खेळ खेळत असतात. पालकांना वाटत असते आपला मुलगा किंवा मुलगी बंद खोलीत मन लावून अभ्यास करीत आहे. पण प्रत्यक्षात मात्र भलत्याच गोष्टी सुरू असतात आणि एकदा का शाळकरी मुले किंवा कॉलेजात शिकणारे तरुण-तरुणींना हे व्यसन लागले की ते सेक्सच्या आहारी जावून आपल आयुष्य बरबाद करून घेतात. म्हणूनच पालकांनो जागते रहो! सोशल मीडिया वरील फेसबुक, व्हॉटसॲप, इंस्टाग्राम आदी गोष्टी अशा प्रकारच्या अश्लिलतेच्यासाठी नाहीत, तर समाजाला सुदृढ आणि सुसंस्कृत करण्यासाठी आहेत. त्यामुळे त्याचा चांगल्या गोष्टींसाठीच वापर व्हायला हवा. सरकार याबाबत बेफिकीर आहे. आपल्याकडे जो सायबर क्राईम नावाचा विभाग आहे तो फारसा प्रशिक्षित नसल्याने त्यांना हे सगळ थांबवणे शक्य नाही. त्यामुळे आता हे थांबवण्यासाठी लोकांनीच पुढाकार घ्यायला हवा. फेसबुकवर काही वेश्या आणि हायप्रोफाइल तृतीय पंथीय लोकांच्याही प्रोफाइल असतात आणि या माध्यमातून ते धंदा करतात. वेश्यां आणि तृतीय पंथी एस्कॉर्टचा सध्या फेसबुकवर सुळसुळाट सुरू आहे आणि आमची तरुण पिढी त्याच्या मागे लागून बरबाद होत आहे. तेंव्हा हे थांबायला हवे. सोशल मीडियावर काही जातीयवादी ग्रुप सुद्धा सक्रिय आहेत आणि आपापल्या जाती धर्माच्या लोकांची माथी भडकविण्याचे काम हे ग्रुप करीत असतात. त्यासाठी जुन्या दंगलींचे फोटो फेसबुकवर टाकले जातात. धार्मिक कार्यासाठी लोकांना जमवून त्यांना भडकावली जाते. लोकांची माथी भडकविणारी अनेक जातीयवादी लेख आणि कॉमेंट्स फेसबुकवर पोस्ट करून वातावरणात तणाव निर्माण केला जातो आणि त्यातूनच पुढे जातीय दंगली घडतात. त्यातून समाज दुभंगली जातो. सोशल मीडियाचा जर अशा विघातक कामासाठी वापर केला जाणार असेल तर या प्लॅटफॉर्मवर सक्रिय असलेल्या चांगल्या लोकांनी आता पुढाकार घेऊन हे सगळ थांबवण्याचा प्रयत्न करायला हवा. सरकारला काही पडलेली नाही. पण सोशल मिडियावरच्या चुकीच्या गोष्टीचा समाजावर वाईट परिणाम होतोय. समाजाला त्याचे दुष्परिणाम भोगायला लागत आहेत. म्हणूनच समाजाला या सर्वापासून वाचवण्याची गरज आहे. त्यासाठीच जागते रहो! पण जर का आपण या अत्यंत ज्वलंत प्रश्नाबाबत बेफिकीर राहिलो, तर येणारी पिढी पूर्णपणे अश्लीलतेचा आहारी जाईल आणि त्यामुळे महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न आणखी गंभीर बनेल. कारण दारू किंवा अमली पदार्थाच्या पेक्षाही पोनोग्राफीच हे व्यसन अत्यंत भयंकर आहे आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून पोनोग्राफी झपाट्याने पसरत आहे. ज्यामुळे संपूर्ण समाजाची नैतिकता आणि महिलांची सुरक्षा धोक्यात आली आहे आणि सर्वात गंभीर बाब म्हणजे आजकाल शाळकरी मुलांच्या हातात स्मार्ट फोन असल्याने तसेच त्यांना अभ्यासाच्या निमित्ताने का होईना संगणक वापरायला दिला जात असल्याने त्यावरील इंटरनेटचा मुलांकडून दुरुपयोग होत आहे. लैंगिक संबंधाबद्दल त्यांचं आकर्षण वादात चालले आहे आणि त्यामुळेच अगदी तेरा चौदा वर्ष वयोगटातील मुले मुलीही बिघडत चालला आहेत. कोवळ्या कळ्या अत्यंत निर्दयपणे कुस्करल्या जात आहेत. त्यामुळे प्रत्येक पालकांनी याबाबत दक्षता घेऊन आपल्या पाल्यावर नझर ठेवण्याची आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून याबाबत समाजाला जागरूक करण्याची आवश्यकता आहे.

# नव्या संसाराची नवी नांदी

राजकारणात कुणीही कुणाचा कायमचा मित्र किंवा कायमचा शत्रू नसतो. कारण इथे उगवत्या सूर्यलाच फक्त नमस्कार केला जातो. अशावेळी बेर्जेचं राजकारण करताना फायद्याचा असेल तर राजकीय शत्रूच्या सुद्धा गळ्यात गळा घातला जातो आणि जवळच्या लोकांना लाथ मारून दूर केले जाते हा सगळा प्रकार सासूर्णी बाय तुझी पाठ मऊ... एकदा किनाऱ्याला लाव मग तुझी आय...! अशातला आहे. त्यामुळे राजकारणात कोण कधी कोणाशी सोयरिक करेल याचा नेम नाही आणि राजकारणी लोकांभोवती नेहमीच संशयाचे वलय असते. अशावेळी उठलेला संशयकल्लोळ देशाच्या किंवा राज्याच्या राजकारणात भलेही उलथापालथ करणारा





ठरला, तरी सामान्य माणसाला मात्र त्याच्याशी घेणे देणे नसते. कारण सगळे राजकारणी हे एकाच माळेचे मणी असतात ही गोष्ट लोकांना यापूर्वीच समजलेली आहे. त्यामुळे आता लोकांचाही राजकारण्यांवर फारसा विश्वास राहिलेला नाही. महाराष्ट्रात सध्या महा विकास आघाडीचे सरकार आहे आणि भाजपा विरोधी बाकावर आहे. पण सत्तेची ऊब घेण्याची सवय लागलेल्या माणसांना विरोधी बाकावर बसणे अवघड झालेले असते. त्यामुळे सरकार पाडण्यासाठी त्यांचे सतत प्रयत्न सुरू असतात. भाजपा कडूनही ते सुरू आहेत. पण त्यांना अपेक्षित यश मिळत नव्हते. मात्र सचिन वाझे प्रकरणात अशा काही गोष्टी घडल्या महा विकास आघाडीतील नेतेच एकमेका कडे संशयाने बघायला लागलेत. त्याचबरोबर या प्रकरणात सरकारची जी नाचक्की झाली त्याबाबत इतरांकडे बोटे दाखवायला लागलेत आणि त्यातून माहविकास आघाडीत काहीशी अस्वस्थता निर्माण झालीय आणि नेमक्या याच मुहूर्तावर राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांनी अहमदाबाद येथील एका फार्म हाऊस वर केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांची भेट घेतली आणि या भेटीनंतर खऱ्या अर्थाने महाराष्ट्राच्या राजकारणात संशय कल्लोळ सुरु झाला. सुरुवातीला अशी कोणतीही भेट झाली नाही असे महा विकास आघाडीचे नेते सांगत होते. पण पुरावे समोर यायला लागताच त्यांच्या माना हलायला लागल्या. मात्र देशाच्या गृहमंत्र्यांची पवारांनी भेट घेतली तर काय झाले? त्यांना कुणीही भेटू शकतो. अशी सारवासारव महा विकास आघाडीचे नेते करू लागले. पण ही भेट काही हवा पाण्यावर चर्चा करण्यासाठी झाली नव्हती किंवा पवार साहेब ढोकळा खायला अहमदाबादला गेले नव्हते आणि वाझे प्रकरणाची फाईल अमित शहा यांच्या टेबलावर असतानाच ही भेट का झाली आणि या भेटीनंतर पवारांनी पश्चिम बंगालच्या निवडणूक प्रचाराचा आपला इरादा का बदलला. या प्रश्नांचे महा विकास आघाडीतील नेत्यांकडे उत्तर नाही किंवा असेल तरी ते देणार नाहीत आणि म्हणूनच महाराष्ट्राच्या राजकारणात संशयकल्लोळ निर्माण झाला असून येत्या काही काळात निश्चितपणे वेगळी राजकीय समीकरणे बघायला मिळणार आहेत आणि त्याच्या केंद्रस्थानी असणार आहे अर्थातच शरद पवार? कारण महाराष्ट्रात ज्याज्या वेळी घडलं बिघडलं या नाट्याचा प्रयोग झाला, त्या त्या वेळी त्या प्रयोगाची पटकथा पवारांनी लिहिल्याचे संपूर्ण महाराष्ट्राने पाहिले आहे आणि आताही तसाच प्रकार घडणार यात शंका नाही. पण शिवसेना एकवेळ कॉंग्रेसची साथ सोडेल, पण पवारांची साथ सोडणे उद्धव ठाकरे यांना परवडणारे नाही. अशावेळी महाराष्ट्रात जर खरोखरच सत्तांतर झाले तर कोण कुठे असेल हे सांगणे कठीण आहे? कदाचित पुन्हा एकदा पहाटेच्या शपथ विधीने महाराष्ट्रात नवी पहाट झालेली असेल. पण यावेळी मात्र त्याचे किमयागार थोरले पवार असतील. कारण धाकट्या पवारांच्या लांब उडीत तेवढी ताकत नाही हे महाराष्ट्राने मागच्या वेळेस पाहिले आहे. मात्र काही झाले तरी राष्ट्रवादी सत्तेमध्ये असेल येवढं मात्र नक्की! तकलादू आघाड्यांची सरकारे अल्पजीवी असतात हे जनता पक्षाच्या राजवटीपासून आपण पाहत आलोय आणि आघाड्यांची सरकारे टिकली तरी त्यांच्यात एकवाक्यता नसल्याने जो कुणी मुख्यमंत्री असतो त्याला काम करणे अवघड जाते.

**संध्या स्ट्रोक**

**सोनू जाधव**

२०१४पूर्वी कॉंग्रेस राष्ट्रवादी आघाडी सरकारमध्ये शह कटशहाच राजकारण किती खालच्या थराला गेलं होत हे लोकांनी पाहिलेलं आहे. आघाडी सरकारसाठी शेवटी बाबाच कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ ठरले! कारण जे काम विरोधी पक्षांनी करायला हवे होते ते त्यांनी स्वतःच केले. त्यांनी आपल्याच सरकारमधील उप मुख्यमंत्री अजितदादा यांचा सिंचन घोटाळा तसेच शिखर बँक घोटाळा उघडकीस आणला. त्यानंतर दादा बाबांच्या या सरकारी लढाईत सगळ्यांच्याच खुरचा गेल्या. त्यानंतर सेना-भाजप युतीच्या सरकारमध्ये सुद्धा तेच घडलं. हिंदुत्वाच्या मुद्यावर एकत्र आलेले हे हिंदुत्ववादी सरकार स्थापन करण्यापासून एकमेकांच्या विरोधात होते आणि सत्तेत आल्यावर तर त्यांच्यात शीतयुद्ध सुरू झाले ते पुढे इतके विकोपाला गेले की सेनेच्या मंत्र्यांना खिशात राजीनामे घेवून फिरण्याची पाळी आली. अर्थात त्यांच्या खिशातले राजीनामे कधी बाहेर आले नाहीत हा भाग वेगळा, पण त्यांनी सरकारमध्ये राहून संशयकल्लोळ तर निर्माण केलाच ना! त्यामुळे शिवसेना असो की भाजप, कॉंग्रेस असो की राष्ट्रवादी सत्तेसाठी हपापलेले हे लोक आहेत त्यांच्यावर कोण विश्वास ठेवेल? आताही वर्षभर कस तरी चाललं होत, पण सचिन वाझे प्रकरणात सगळ्यांचेच पितळ उघडं पडल्याने त्यांच्यावर पुन्हा एकदा नव्या वाटा शोधण्याची पाळी आली आहे. पण त्याचा महाराष्ट्रातील जनतेवर काहीही परिणाम होणार नाही. त्यांच्या लेखी एक भटजी गेले. दुसरे भटजी आले. एवढंच या संभाव्य सत्तंतराचा अर्थ दुसरे काय!

**मोबाईल नंबर : ७०२१४७६१५३**

# २०२१ फळं आणि भाजीपाल्याचं वर्ष!



**जग दिशायन**

२०२१ हे वर्ष युनायटेड नेशन्सनं आंतरराष्ट्रीय फळं आणि भाजीपाल्यांचं वर्ष म्हणून जाहिर केलं आहे. या उपक्रमाद्वारे निरोगी शरीरासाठी फळं आणि भाज्यांची गरज, फायदे आदींचा प्रचार करण्याच्या उद्दीष्टाने हे पाऊल उचलण्यात आले आहे. माणसाची मूलभूत गरज कोणती, असा प्रश्न विचारल्यावर सगळेच म्हणाल, अन्न, वस्त्र, निवारा. यापैकी अन्न हे पोट भरण्याबरोबच ते पोषक असणंही तितकंच गरजेचं आहे. बदललेल्या जीवनशैलीत फास्टफूड खाण्याकडेच लोक वळले आहेत. यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. तसेच कोरोनामुळे सात्विक अन्नाचे महत्त्व प्रकर्षाने लक्षात आल्यामुळे २०२१ वर्ष हे आंतरराष्ट्रीय फळ आणि भाजीपाला वर्ष' म्हणून साजरं केलं जाणार आहे.

हिरव्या पालेभाज्यांमध्ये सर्वाधिक पोषक घटक असतात. भारत हा शाकाहाराला प्रोत्साहीत करणारा देश मानला जातो. त्यामुळे भारतातच सर्वाधिक पालेभाज्या खाल्लया जातात. यात पालक, मेथी, माठ, चवळी, भोपळ्याचा पाला, अळू, अंबाडी, करडई, पुदिना, कोथिंबीर, शेवगा, शेपू, तांदुळसा, चुका, चाकवत, राजगिरा, अळू, कडिपत्ता, घोळ, हादग्याची पाने आणि रानभाज्या इत्यादींना पानात पसंती मिळते. हिरव्या भाज्यांमध्ये कॅल्शियम, कॅरोटिन, 'अ', 'ब', 'क' जीवनसत्त्वं, प्रथिनं, लोह, मॅंगनेशिअम, थियामीन, रायबोफ्लेविन आदी घटक असतात. यापैकी कशाची आपल्या शरीरात कमी असेल तर आपण कृत्रिमरीत्या बनवलेल्या पावडरी, गोळ्या घेऊन ती गरज भरून काढतो. मात्र त्याच सिंथेटीक पदार्थाचे आपल्या शरिरावर दुष्परिणामही होत असतात. भारतात पाच वर्षाखालच्या अंदाजे तीस हजार बालकांना अंधत्व येतं. कारण कॅरोटीन आणि 'अ' जीवनसत्त्वयुक्त पदार्थाचा अभाव असतो. जर बालकांना आपल्याच आजूबाजूच्या परिसरात उगवणाऱ्या पालेभाज्या खायला दिल्या, तर त्यांना अनेक आजारांपासून लांब ठेवता येईल.

भाज्यांमध्ये मूळ, खोड, पानं, फळं आणि फुलं यांचा समावेश होतो. मुळा, रताळं, गाजर, बीट, सुरण, बटाटा, कांदा, लसूण इत्यादी खोड, मुळंही भाजीपाल्यांचा भाग आहेत. भाजीपाला आहे त्या स्थितीत किंवा शिजवून खाल्ला जातो. भारतात २.५ टक्के शेती भाजीपाल्याची होते. महाराष्ट्रात हे प्रमाण १.६ टक्के आहे. वसई, नाशिक, पुणे आणि सातारा जिल्ह्यात भाजीपाला शेती मोठ्या प्रमाणात होते. भाजीपाल्याच्या शेतीत कष्ट जास्त असले, तरी उत्पन्नही जास्त मिळतं. मांसाहार हा मानवी शरीरासाठीचा आहार नाही, असे आजकाल सांगितले जाते. कारण, पूर्वी प्रत्येक माणूस मांसाहार करत होता. त्यावेळी माणसाला जगण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. त्याकाळी गरज म्हणून कच्चा, आगीवर भाजलेला मांसाहार करणं भाग होतं. मात्र आता मांसाहारामुळे निर्माण होणारी ॲसिडिटी भाजीपाल्यामुळे नष्ट होते. भाज्यांमुळे अन्न सहज पचायला मदत होते. अनेक व्यक्ती भाज्या अधिक वेळ शिजवतात किंवा भाजी शिजल्यावर त्यातील पाणी काढून टाकतात. यामुळे भाज्यांमधून मिळणारी पोषणमूल्यं कमी मिळतात. भाज्या शिजवताना त्यावर झाकण ठेवून शिजवाव्यात. भाज्या थेट उनात वाळवल्यास त्यातील कॅरोटिन कमी होते. ताज्या भाज्या खाणं शरीरासाठी आवश्यक असतं. माणसाच्या शरीराला ४० ते ५० ग्रॅम हिरव्या पालेभाज्या दररोज खाण्याची गरज असते.

मानवी शरीराला निरोगी ठेवण्यात फळांचं महत्त्वही भरपूर आहे. फळांमधे ९० ते ९५ टक्के शुद्ध पाणी असतं. फळांमुळे रक्ताचं शुद्धीकरण होतं. फळातल्या तंतुमय पदार्थामुळे आतड्यांचं आकुंचन आणि प्रसरण चांगलं होतं. यामुळे पचनसंस्था सुरळीत होण्यास मदत मिळते. आवळा, संत्री, मोसंबी, लिंबू या पदार्थांमधे क' जीवनसत्त्व मोठ्या प्रमाणात असतं. केळी, बोर, आंबा, जांभूळ, चिंच, सीताफळ, रामफळ, चिकू, डाळिंब या फळांमधे विटॅमिन, आम्ल, संप्लवनशील फॅट्स असतात. त्यामुळे भूक चांगली लागते. आंबा, कलिंगड, चेरी अशा फळांमध्ये बीटा कॅरोटिन असतं. यामुळे डोळे चांगले राहतात. कर्करोगापासूनही बचाव होतो. मुख्य म्हणजे ही फळ विविध जीवनशैली आजारांमुळे होणाऱ्या त्रासापासून सुटका करतात. फळांमधे १० ते १५ टक्के क्षार असतं. यात कॅल्शियम, सोडियम, पॉटेशियम, मॅग्नेशियम, सल्फर, फॉस्फरस, लोह क्षार असतात. कॅल्शियममुळे हाडं मजबूत होतात. दातांचं आरोग्य चांगलं राहतं. रक्तातील कॅल्शियम कमी झालं तर माणसाचा चिडका स्वभाव उफाळून येतो. चिडचिड वाढते. फळातून मिळणारं मॅग्नेशियम मेंदूचं काम सुरळीत ठेवतं. रक्तातलं लोहाचं प्रमाण कमी झालं की, माणसाचा उत्साह कमी होतो.

फॉस्फरसचं प्रमाण कमी, जास्त झालं तर हाडांचं आरोग्य बिघडतं. पॉटेशियमचं प्रमाण कमी झालं तर रक्त गोठत नाही. यकृत उत्तेजना हे पॉटेशियमचं दुसरं महत्त्वाचं काम आहे. फळांचं निसर्गात उपलब्ध होणं त्या त्या ऋतूमधे मानवी शरीराला निरोगी ठेवण्याच्या दृष्टीने असतं. ज्या त्या ऋतूत पिकणारी फळं पुरेशा प्रमाणात खाणं मानवी आरोग्यासाठी चांगलं असतं. आयोडिनमुळे थॉयरॉईड ग्रंथीचं काम चांगलं राहतं. काही फळं वाळवून किंवा सुकलेल्या अवस्थेत असतात. खारीक, खोबरं, पिस्ता, बदाम, अक्रोड, चारोळी, काजू, बिबा फळं सुकलेली असतात. त्यांना सुका मेवा म्हणतात. फळं ही वरदान आहेत. फलाहार उत्तम आहार आहे. मात्र, फळं जेवणापूर्वी खाणं चांगलं असतं. मानवी शरीरासाठी आवश्यक फळं, भाजीपाला आवश्यक आहे तसंच शुद्ध पर्यावरणाची गरज आहे. शेतीतून फळं आणि भाजीपाला मोठ्या प्रमाणात पिकवण्यासाठी रासायनिक खतं आणि कीटकनाशकांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जातो. त्यांचा मारा मोठ्या प्रमाणात असल्याने, न वापरली जाणारी खतं आणि रसायनं पावसाच्या पाण्याबरोबर वाहत जातात. त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाण्याचं प्रदूषण होत आहे. त्याचबरोबर वनस्पतींच्या फुलांचं परागीभवन करणारे कीटक मोठ्या प्रमाणात मरतायत. यामुळे मधमाश्याही मरण पावत आहेत. फळं आणि भाजीपाला जसा माणसाच्या आयुष्यात आवश्यक आहेत, तसंच निसर्गातले कीटक आणि इतर जीवांचं अस्तित्वही आवश्यक आहे. यासाठी आपण फळांचं आणि भाजीपाल्यांचं सेंद्रिय पद्धतीने उत्पादन करणं माणसांसह पक्षी, प्राणी, कीटक यांच्याकरीताही आवश्यक आहे. करोना आणि जीवनशैली आजारांपासून मुक्तता मिळवण्यासाठी नव नव्या आजारांपासून स्वत:ला लांब ठेवण्यासाठी फळे आणि भाजीपाल्याचे सेवन करणे गरजेचे आहे. यंदाच्यावर्षी फक्त साजरा करण्यासाठी या पदार्थाचे सेवन करू नये, तर आपल्या आणि पुढच्या पिढीच्या निरामय जीवनासाठी सेंद्रीय पद्धतीने उगवलेल्या फळे, भाजीपाल्याचे सेवन करणे गरजेचे आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाउंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून काशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

## थोडक्यात वृत्तांत

### खाडगावरोड येथे दलीतोत्तर विकासनिधीतून ८ लाख ४६ हजार निधीचे नालीकाम पूर्ण!

लातुर : राज्याचे वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख लातूर शहर विधानसभा निवडणूक प्रचाराच्या निमीत्ताने प्रभाग क्रमांक १३ मधील संभाजीनगर, खाडगाव रोड मुस्तफा कॉलनी येथे गेले होते. त्यावेळी तेथील नागरिकांनी त्यांची भेट घेऊन मूलभूत सुविधासाठी लिवो मेडिकल दुकान व सोहेल काझी यांचा घर आणि परिसरात नाली बांधकाम करण्यात यावे, अशी मागणी त्यांच्याकडे करण्यात आली होती. त्यावेळी पालकमंत्री देशमुख यांनी सदरील काम करून देण्यात येईल असे आश्वासन नागरीकांना दिले होते. प्रभाग क्रमांक १३ मधील संभाजीनगर, खाडगाव रोड, मुस्तफा कॉलनी परिसरातील नागरिकांनी आणि तेथील पदाधिकारी कार्यकर्त्यांनी केलेल्या मागणीप्रमाणे सदरील कामासाठी ना. अमित विलासराव देशमुख यांच्या सुचने प्रमाणे लातूर शहर महानगरपालीका बांधकाम विभागाकडून दलीतोत्तर निधी अंतर्गत ८ लाख ४६ हजार रुपये विकास निधी देऊन तेथे नाली बांधकाम आणि मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. नागरीकांच्या मागणी प्रमाणे मुस्तफा कॉलनी लिओ मेडीकल ते सोहेल काझी यांच्या निवासस्थान पर्यंत रस्त्याच्या दोन्ही बाजूने नाली बांधकाम करण्यात आले आहे. कंत्राटदार विदयासागर कंबोज यांनी सदरील काम मजबूत व गुणवत्तापूर्ण केल्या बददल नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. पालकमंत्री ना. अमित विलासराव देशमुख यांनी निवडणुकीत दिलेला शब्द खरा करून नाली बांधकामासाठी ८ लाख ४६ हजार रुपये विकास निधी दिला आहे. प्रभागातील नागरीकांना दिलेल्या आश्र्वासन पूर्ततेसाठी नगरसेवक पप्पू देशमुख, नगरसेवक योजना कामेगावकर, नगरसेवक आयुब मणियार, वसीम काझी, शेख महम्मद, कमल सोमवंशी, सुरज सोळुंके, शकील काझी आदी नागरिकांनी आभार मानले आहेत.

### परदेश शिष्यवृत्ती योजनेसाठी प्रतीक्षा यादीतील ९ उमेदवारांची वर्णी

मुंबई : अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील विद्यार्थ्यांना नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी देण्यात येणाऱ्या राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेच्या नियमात मागील आठवड्यात सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी अंशतः बदल केले होते. त्यामुळे या शिष्यवृत्ती योजनेचा कोटा २००३-०४ नंतर प्रथमच १००% पूर्ण झाला आहे. अंतिम निवड झालेल्या विद्यार्थ्यांनी काही कारणास्तव शिष्यवृत्तीचा लाभ नाकारल्यास प्रतीक्षा यादीतील विद्यार्थ्यांना गुणानुक्रमे संधी देण्यात येईल असा निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री धनंजय मुंडे यांनी घेतला होता. दरवर्षी ७५ विद्यार्थ्यांना या योजनेअंतर्गत लाभ दिला जातो. २०२०-२१ या शैक्षणिक वर्षात परदेशी विद्यापीठात शिक्षण घेण्यासाठी निवड समितीने अंतिम निवड केलेल्या ७५ पैकी ९ विद्यार्थ्यांनी या शिष्यवृत्तीचा लाभ नाकारल्याने ९ जागा रिक्त झाल्या होत्या. मात्र मुंडे यांनी केलेल्या नव्या निर्णयामुळे या ९ जागी प्रतीक्षा यादीतील ९ विद्यार्थ्यांची गुणानुक्रमे निवड करण्यात आली आहे. याबाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून, यामुळे २००३-०४ नंतर प्रथमच या योजनेतील लाभार्थींचा कोटा १००% पूर्ण झाला आहे. अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकातील पदव्युत्तर पदवी किंवा पीएचडीचे शिक्षण घेणाऱ्या जागतिक क्रमवारीतील ३०० पैकी विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळवलेल्या ७५ विद्यार्थ्यांना या शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत लाभ देण्यात येतो. जुन्या नियमानुसार अंतिम निवड झालेल्या विद्यार्थ्याने काही कारणास्तव ऐनवेळी लाभ नाकारला तर ती जागा रिक्त राहत असे, या रिक्त जागी प्रतीक्षा यादीतील उमेदवारास संधी देण्यात यावी याबाबतचा निर्णय धनंजय मुंडे यांनी नुकताच जाहीर केला होता. दरम्यान प्रतीक्षा यादीतील ९ उमेदवारांना या योजनेतील नव्या नियमामुळे आता शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार असल्याचे शासन निर्णयाद्वारे जाहीर करण्यात आले असून, यासाठी या विद्यार्थ्यांनी सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे व सामाजिक न्याय विभागाचे आभार मानले आहेत.

### दर्जीबोरगाव आयुर्वेदिक दवाखाना इमारत बांधकामास वाढीव निधी दिल्याबद्दल आभार

लातूर : रेणापूर तालुक्यातील मौज दर्जीबोरगाव येथील आयुर्वेदिक दवाखाना इमारत बांधकामासाठी १५ लाखाचा वाढीव निधी मंजूर केल्याबद्दल भाजपाचे नेते आ. संभाजीराव पाटील निलंगेकर आणि जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहूल केंद्रे यांचा सत्कार करून रेणापूर पंचायत समितीचे सभापती रमेश सोनवणे यांनी आभार मानले. लातूर जिल्हा परिषदेच्या वतीने रेणापूर तालुक्यातील मौजे दर्जीबोरगाव येथे अनेक वर्षापूर्वी आयुर्वेदिक व युनानी दवाखाना सुरू केला आहे. या दवाखान्यात नियमीतपणे विविध आजारावरील रूग्ण उपचार घेण्यासाठी येतात. मात्र सदरील दवाखान्याची इमारत अत्यंत जीर्ण झाल्याने धोकादायक निर्माण झाली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या सरकारने सदर दवाखान्याच्या इमारतीसाठी ५० लाखाचा निधी मंजूर केला होता. शासनाने मंजूर केलेला निधी अपुरा पडत असल्याने दर्जीबोरगाव येथील या आयुर्वेदिक दवाखान्याच्या इमारतीचे काम रखडले होते. वाढीव निधी मिळावा यासाठी भाजपाचे जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व संबंधीताकडे वेळोवेळी प्रयत्न करण्यात आला होता. गेल्या ८ मार्च २०२१ रोजी झालेल्या जिल्हा परिषदेच्या वार्षीक सर्वसाधारण सभेत रेणापूर पंचायत समितीचे सभापती रमेश सोनवणे यांनी वाढीव निधी मिळावा अशी मागणी लावून धरली होती. या मागणीची तातडीने दखल घेवून जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहूल केंद्रे आणि आरोग्य सभापती तथा उपाध्यक्षा भारतबाई साळूंके यांनी दर्जीबोरगाव येथील आयुर्वेदिक दवाखान्याच्या इमारत बांधकामासाठी १५ लाखाचा वाढीव निधी मंजूर केला आहे. गोरगरीब जनतेच्या आरोग्य हितासाठी दर्जीबोरगाव येथील आयुर्वेदिक दवाखान्याच्या इमारत बांधकामासाठी १५ लाखाचा वाढीव निधी मंजूर केल्याबद्दल भाजपाचे नेते आ. संभाजीराव पाटील निलंगेकर आणि जिल्हाध्यक्ष आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषदेचे अध्यक्ष राहूल केंद्रे यांचा सत्कार करून रेणापूर पंचायत समितीचे सभापती रमेश सोनवणे यांनी आभार मानले. यावेळी भाजपाचे जिल्हा सरचिटणीस संजय दोरवे, ओबीसी आघाडीचे जिल्हाध्यक्ष बापुराव राठोड, जेष्ठ कार्यकर्ते दगडू साळूंके, समाजकल्याण सभापती रोहीदास वाघमारे, कृषी सभापती गोविंद चिलकुरे उपस्थित होते.

# भिवंडीत विवाहितेवर बलात्कार करणारा नराधम रिक्षाचालक अटक




**भिवंडी/आकाश गायकवाड**

एका नराधम रिक्षाचालकाने पीडित विवाहितेचे रिक्षातून अपहरण करत तिला निर्जनस्थळी असलेल्या खोलीत डांबून तिच्यावर सतत दोन दिवस मारहाणीची धमकी देऊन बलात्कार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. विशेष म्हणजे रमाबाई ब्रिगेड महिला संघटनेच्या अध्यक्षा ज्योती गायकवाड यांच्या सतर्कतेमुळे व पोलिसांच्या तात्काळ कारवाईमुळे नराधमाच्या मुसक्या आवळण्यात पडघा पोलीसांना यश आले आहे. शारदाप्रसाद देवमडी मिश्रा (वय ५५, रा. खडवली) असे पोलिसांनी अटक केलेल्या नराधमाचे नाव आहे. भिवंडी तालुक्यातील पडघा- बोरिवली गावात २५ वर्षीय पीडिता कुटूंबासह राहते. ती गुरुवारी १८ मार्च रोजी सकाळच्या सुमारास नेहमीप्रमाणे धूनेभांड्याचे काम करण्यासाठी आपल्या सासुबरोबर जात होती. मात्र त्या दिवशी तिची तब्बेत नव्हती. परंतु काही वेळाने तिला बरे वाटल्याने ती सकाळच्या सुमारास कामाला जात असताना आरोपी रिक्षाचालक शारदा प्रसाद याने तिला रस्त्यातच गाठून जबरदस्तीने रिक्षात बसवून तिचे अपहरण केले. मात्र तिची तब्बेत बरी नसल्याने ती चक्कर येऊन रिक्षात झोपली. त्यानंतर शुद्धीवर आली त्यावेळेस ती एका खोलीत विवस्त्र अवस्थेत होती. तसेच आरोपी रिक्षाचालक देखील विवस्त्र अवस्थेत होता. हे पाहून पीडिता भयभीत झाल्याने तिला धक्काच बसून तिला समजले की या नराधमने तिच्यावर बळजबरीने बलात्कार केला. पिडीतीने रिक्षाचालकास घरी जायचे सांगितले परंतु या नराधम रिक्षाचालकाने तिला मारहाणीची धमकी देत त्या खोलीत कोंडून तो सायंकाळी कुठेतरी बाहेर गेला असता पीडितेने तिच्या पतीस मोबाईलवरून फोन करण्याचा प्रयत्न केला परंतु बॅलन्स नसल्याने संपर्क झाला नाही. काही वेळाने हा नराधम पुन्हा घटनस्थळी आला व त्याने तिच्यावर पुन्हा बळजबरीने बलात्कार केला. घटनेच्या दुसऱ्या दिवशी रमाबाई ब्रिगेड महिला संघटनेच्या अध्यक्षा ज्योती गायकवाड यांना पीडितेच्या आईचा फोन आला असता ज्योती गायकवाड यांनी पीडित महिलेचा मोबाईल नंबर मिळवून पीडित महिलेशी संपर्क केला असता पिडीतीने पडघा पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या लकी हॉटेल असे बोलताच फोन बंद झाला. या पुराव्याच्या आधारे गायकवाड यांनी शहापूर उपविभागीय पोलीस अधिकारी नवनाथ ढवळे व शहापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक घनश्याम आढाव यांना संपर्क करून अपहरण झाल्याचा प्रकार सांगितला. पोलीसांनी तत्काळ आसनगाव येथील परिवार गार्डन हॉटेल समोर नाकाबंदी केली त्यावेळी पोलीसांसमवेत ज्योती गायकवाड तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी ढवळे यांनी पडघा पोलीस उपनिरीक्षक राजकुमार आडगळे यांना पुढील तपास करण्यास सांगितले. दरम्यान नराधम रिक्षाचालक MH05 BG1689 या क्रमांकाच्या रिक्षाने पीडितेला खडवली फाट्यावरील लकी हॉटेल येथे घेऊन आला. त्याच सुमारास पीडितेच्या भावाने संपर्क केला असता तिने लकी ढाबा येथे असल्याचे सांगितले; असता त्या ठिकाणी धाव घेऊन पीडितेची त्या नराधमाच्या तावडीतून सुटका करून नराधमाला घेऊन पडघा पोलीस ठाण्यात आणले. या प्रकरणी नराधम रिक्षाचालक शारदा प्रसाद याचेवर पडघा पोलीस ठाण्यात भारतीय दंड संहिता १८६० अधिनियमानुसार कलम ३६३, ३७६ व ३४२ नुसार गुन्हा दाखल करून त्याला न्यायालयात हजर केले असता पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. तर पीडित महिलेस तिच्या नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. या गुन्ह्याचा अधिक तपास पडघा पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक राजकुमार आडगळे करत आहे

## माजी वनमंत्री संजय राठोड यांचा वसई व पालघर शासकीय दौरा!

**पालघर/मच्छिंद्र चव्हाण**



बंजारा समाजाचे सुपुत्र व आमदार तथा माजी वनमंत्री संजय राठोड यांच्या सोबत प्रा.सी.के.पवार बंजारा चित्रपट निर्माता व दिग्दर्शक यांचा संपूर्ण महाष्ट्रातील बंजारा समाजिक बहुल जिल्हा, तालुका तसेच तांडावस्ती मध्ये दौरा असणार आहे त्याची सुरुवात वसई,पालघर जिल्ह्यातून होणार असून पालघर जिल्हा दौरा, सोमवार दिनांक ५ एप्रिल २०२१ रोजी वसईगाव येथे दौऱ्यावर येणार आहे. दौऱ्यावर असताना खालील विषयावर चर्चा करण्यात येईल. यासाठी कोरोना नियमाचे काटेकोर पालन करून सर्व संबंधितांना या दौऱ्याबाबत अवगत असावे. १) जिल्हा समन्वय समिती सदस्यांची सदिच्छा भेट, २) कोरोना काळात मजूरी करणारे जिल्ह्यातील गोर बंजारा समाजाचे नागरीक व तांड्यातील समस्यां जाणून त्या सोडवण्यासाठी पाठपुरावा, ३) पोहरागड येथे होणाऱ्या नंगारा संग्रहालयासाठी आवश्यक असणाऱ्या समाजातील दुर्मीळ वस्तू, दस्तावेज, चलचित्रांचे संकलन, ४) जिल्ह्यातील गोर बंजारा बहूल मतदारसंघ तसेच प्रमुख तांड्याना भेटी देणे, ५) राज्यातील सर्व जिल्ह्यातील दौरा आढावा घेऊन नंगारा संग्रहालयाची अंतर्गत बाबी निश्चित करणे व प्राप्त समस्यांवर राज्य शासनाकडे पाठपुरावा करून त्या सोडविणे, ६) ऐनवेळचा विषय, सोमवार दिनांक ५ एप्रिल २०२१ दुपारी १२ वाजता वसई गाव रेस्ट हाऊस, वसई जि पालघर आणि सायंकाळी ४ वाजता पालघर शासकीय विश्रामगृह, कोर्ट नाका,जि. पालघर अशा दिनक्रम असणार आहे.

## भिवंडी शहराला मुंबई पालिकेकडून मिळणार दोन दशलक्ष लिटर वाढीव पाणीपुरवठा!





**भिवंडी/अभिजित हिरे**

शहरातील वाढत्या लोकसंख्येच्या पार्श्वभूमीवर शहराला वाढीव २ दशलक्ष लिटर पाणीपुरवठा करण्यास मुंबई महापालिकेचे आयुक्त इक्बालसिंह चहल यांनी मंजुरी दिली आहे. खासदार कपिल पाटील यांनी यासाठी मुंबई मनपा आयुक्तांकडे पाठपुरावा केला होता त्यांच्या मागणीची दखल घेत शहराला वाढीव पाणीकोटा मंजूर करीत असल्याचे पत्र मुंबई मनपा आयुक्तांनी खासदार पाटील यांना पाठविले आहे. या वाढीव पाणीपुरवठ्यामुळे शहरातील नागरिकांची पाणी समस्या कमी होणार आहे. यंत्रमाग व गोदामपट्टा यामुळे शहरात लोकसंख्येत सातत्याने वाढ होत आहे. त्यामुळे येथे नेहमी पाणीटंचाई भासत आहे. मुंबई महापालिकेबरोबरच भिवंडी शहराला स्टेमकडूनही पाणीपुरवठा केला जातो. मात्र वाढत्या लोकसंख्येमुळे हा पाणीपुरवठा सातत्याने अपूरा पडत आहे. त्यामुळे वाढीव पाणीपुरवठा करण्यासाठी खासदार कपिल पाटील यांनी मुंबई महापालिकेचे आयुक्त इक्बालसिंह चहल यांना पत्र पाठविले होते. तसेच त्यांच्याबरोबर चर्चाही केली होती. अखेर मुंबई महापालिकेने भिवंडी शहराला वाढीव २ दशलक्ष पाणीपुरवठा करण्यास मंजुरी दिली आहे. भिवंडी महापालिकेने तांत्रिक बाबींची पूर्तता केल्यानंतर जलजोडणी देण्यात येणार असल्याचे आयुक्त चहल यांनी खासदार कपिल पाटील यांना पाठविलेल्या पत्रात नमूद करण्यात आले आहे.

## बेकायदेशीर पिस्तुल मधुन फायरिंग करणाऱ्या आरोपीला कोपरखैरणे पोलिसांनी केली अटक

**नवी मुंबई/सुनिल गायकवाड**

कोपरखैरणे सेक्टर १९ जीमी टॉवर या भागात क्षुल्लक कारणावरुन एक ३१ वर्षीय तरुणाने आपल्या जवळील बेकायदेशीर पिस्तुलामधुन एक राऊंड जमिनीवर फायर केल्याची घटना दिनांक १६ /०३/२०२१ रोजी सोमवार रात्री ९:३० च्या दरम्यान घडली आहे. या घटनेने कायदा आणि सुव्यवस्थे चा प्रश्न ऐरणी वर आला आहे .कोपरखैरणे पोलिसांनी या घटनेचा बिमोड करण्यासाठी आरोपीला अवघ्या ४८ तासात ताब्यात घेऊन बोलते केले आहे. सुदैवाने या फायरिंग दरम्यान कोणतीही जखमी अथवा जीवित हानी झालेली नाही. या बाबत माहीती आशी कि आरोपी रुपेश अरुन करकेरा वय (३१) तो मुळचा कर्नाटक राज्यातील पडिविंद्री मेग्लोर येथला असुन तो सध्या सेक्टर २ कोपरखैरणे नवीमुंबई येथे वास्तव्यास आहे.



हा आरोपी आपल्या स्कूटीवरुन जीम टॉवर से १९ कोपरखैरणे या ठीकणी जात होता त्याच्या स्कूटी ची धडक एका टूरिस्ट कारच्या पाठी लागली असता कारवाला व आरोपी रुपेश करकेरा यांच्यात शाब्दीक बाचाबाची झाली आरोपी रुपेश यांनी क्षणाचा विलंब ना लावात आपल्या कमरेला असलेले बेकायदेशीर पिस्तुल काढून जमिनीवर एक राऊंड फायरिंग केली या फायरिंग दरम्यान हा परिसर पुरता हादरुन गेला आहे. याच पिस्तुल मधुन फायर झालेली गोळी जमिनीवर फायर झाली नसती तर कोणत्या तरी निषप्पा नागरीकांचा बळी गेला असता. कोपरखैरणे पोलिस ठाण्याचे वरीष्ठ पोलिस निरीक्षक प्रदिप तिदार यांनी या घटनेची गंभीर दखल घेत आरोपी संबंधी कोणतीच माहीती हाती नसतांना आपल्या सुत्राचा वापर करुन आरोपी ला पिस्तुल व वापरत असलेल्या दोनचाकी गाडी सह ताब्यात घेऊन त्याच्या मुसक्या आवळण्यात यश प्राप्त केले आहे. आरोपीने केलेल्या गुन्ह्याची कबुली कोपरखैरणे पोलिसैंना दिलेली असुन आरोपीची पार्श्वभूमी ही गुन्हेगार स्वरुपाची आहे. या पुर्वी देखील त्याच्या वर कोपरखैरणे पोलिस ठाण्यात गुन्हा नोद असल्याची माहीती समोर आली आहे. दरम्यान: या तपासा कामी नवीमुंबई पोलिस आयुक्त बिपीनकुमार सिंग, पोलिस उपआयुक्त सुरेश मेगडे परिमंडळ एक, सहायक पोलिस आयुक्त विनायक वस्त, यांच्या मार्गदर्शन खाली करुन वरिष्ठ पोलिस निरीक्षक प्रदिप तिदार, पोलिस निरीक्षक प्रशासन गजानन कदम, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे निलेश येवले, सहय्यक पोलिस निरीक्षक राजरत्न खैरनार,निलेश धुमाळ, गोरखनाथ बालवडकर, सोपान राखोडे, स्वपनील शेळके, समीर कटपाळे, गणपत पवार, पोलिस हावलदार दिनेश पाटिल, विकास निकम, राकेश पाटिल, गणेश चौधरी, किरण बुधवंत, शंकर भांगरे, गणेश गीते, अमोल भोसले यांनी मेहनत घेऊन आरोपीला जेरबंद केले.

## हरवलेल्या लहान मुलाचा एका तासात लावला शोध

### शिवाजी नगर पोलिसांची उत्कृष्ठ कामगिरी



**लातूर/अमर करकरे**

शहरातील खाडगांव रोड भागातून हारविलेल्या एका अल्पवयीन बालकाचा आवघ्या एका तासात शोध घेवून त्याला नातेवाइकांच्या ताब्यात देत शिवाजी नगर पोलिसांनी उत्कृष्ठ कामगिरी केली आहे.

या बाबत पोलिस सुत्रांकडून मिळालेली माहीती अशी की, ०२ एप्रिल २०२१ रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास शहरातील खाडगाव रोड, सुशीलादेवी कॉलेज जवळ राहणारी एक वृद्ध महिला शिवाजी नगर पोलीस ठाणे आली. त्यांचा नातू नामे रुद्र शिवकुमार छत्रबंद (वय ०८ वर्ष रा. लातूर) हा सकाळी हरवलेची तक्रार सांगून पोलिसांना शोध घेण्याची विनंती केली. ऑन ड्युटी असलेले पोलीस ठाणे अंमलदार गारोळे यांनी सदरील वृद्ध महिलेकडून हरवलेल्या मुलाची पूर्ण माहिती नाव, पत्ता, त्याचे वर्णन घेतले. ठाणे अंमलदारांनी तात्काळ पेट्रोलिंगला असलेल्या चार्ली व जीप पेट्रोलिंगवर असलेल्या पोलीस अधिकारी यांना वायरलेस व फोनद्वारे हरवलेल्या मुलाचे वर्णन सांगून हरवलेल्या मुलाचा शोध घेण्यास कळविले. त्यावरून शिवाजी नगर पोलीस ठाण्यातील पोलिस अधिकारी आणी पोलिस कर्मचाऱ्यांनी हरवलेल्या मुलाचा शोध घेण्यास सुरुवात केली. दरम्यान पेट्रोलिंग ड्युटीवर असलेले पोलीस अमलदार देवकते यांना ठाणे अंमलदार यांनी दिलेल्या माहिती प्रमाणे त्या वर्णनाचा एक मुलगा शिवाजी चौकात मिळून आला त्यावर देवकते यांनी त्या मुलास सोबत घेऊन पोलीस स्टेशनला आणले व मुलास विश्र्वासात घेऊन विचारपूस केली असता तो मुलगा रुद्र शिवकुमार छत्रबंद असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे नातू हरवल्याची तक्रार देण्यास आलेल्या मुलाच्या आजीला पोलीस स्टेशनला बोलावून मिळून आलेला लहान मुलगा रुद्र शिवकुमार छत्रबंद याला त्याच्या आजीच्या ताब्यात देण्यात आले. शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी दाखवलेल्या तत्परतेमुळे १ तासातच हरवलेला लहान मुलगा मिळून आल्याने पोलीस अधीक्षक निखिल पिंगळे, अपर पोलीस अधीक्षक हिम्मत जाधव यांनी शिवाजीनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुनीलकुमार पुजारी, पोलीस ठाणे अंमलदार गारोळे, पोलीस अंमलदार देवकते यांचे अभिनंदन केले आहे.

## लातूर मनपाच्या वतीने ४५ वर्ष वरील नागरिकांना मोफत कोरोना लसीकरण

**लातूर/प्रतिनिधी**

शासनाच्या निर्देशानुसार लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने वय वर्ष ४५ पुढील सर्व नागरिकांना कोरोना लसीकरणास प्रारंभ करण्यात आला. महापौर विक्रांत गोजमगुंडे व उपमहापौर चंद्रकांत बिराजदार यांच्या उपस्थितीत या मोहिमेचा शुभारंभ औषधी भवन येथील केंद्रावर करण्यात आला. पहिल्या दिवशी शहरातील शेकडो नागरिकांनी लस घेतली. यावेळी रामदास भोसले, ईश्र्वर बाहेती, लातूर केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिशन चे पदाधिकारी तसेच मनपा आरोग्य विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.शहरातील ४५ वर्ष व अधिक वयोगटातील नागरिकांसाठी लसीकरण नोंदणी सुरू झाली असून ही नोंदणी करत या वयोगटात असणाऱ्या नागरिकांनी लसीकरण करून घेण्याचे आवाहन महापौर विक्रांत गोजमगुंडे यांनी केले आहे. लसीकरणाच्या पुढील टप्प्याबाबत माहिती देताना महापौर गोजमगुंडे म्हणाले की, ४५ वर्ष पुढील सर्व नागरिक या दोन्ही वयोगटात समाविष्ट असणाऱ्या नागरिकांनी आपल्या मोबाईल मध्ये आरोग्यसेतू प अथवा उज-ुळप प डाऊनलोड करावे. लुेळप.सीें.ळप या वेबसाईटवरही नोंदणी करता येऊ शकते. तेथे मिळणाऱ्या सूचनांनुसार नागरिकांनी आपली नोंदणी करून घ्यावी. संबंधित पमध्ये नागरिकांनी नजीकचे लसीकरण केंद्र आणि तारखेची निवड करता येणार आहे. हे शक्य नसेल तर लसीकरण केंद्रावर जाऊनही नोंदणी करता येऊ शकते. मनपाच्या लसीकरण केंद्र येथे मोफत लसीकरण करण्यात येणार आहे.लातूर मनपाच्या वतीने पटेल चौक येथील नागरी आरोग्य केंद्र, राजीव नगर येथील नागरी आरोग्य केंद्र, लोकांते विलासरावजी देशमुख मार्ग येथील औषधी भवन, विलासरावजी देशमुख आयुर्विज्ञान केंद्र, जिल्हा शासकीय रुग्णालय परिसर येथे मोफत लसीकरण सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

05 TO 11 APRIL 2021 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1 03/04/2021 9:26 PM Page 1



पान १ वरून....

## अन्नदात्या बळीराजाला कुणीच ...

महाराष्ट्रात सरकार असो, विरोधी पक्ष असो, जिल्हा प्रशासन असो कि पोलीस असोत. सगळीच यंत्रणा गरीब शेतकऱ्याच्या जीवावर उठलीय. त्यामुळे या अन्नदात्याने दाद मागायची तरी कुणाकडे असा प्रश्न निर्माण झाला आहे. एकीकडे निसर्गाच्या प्रकोपामुळे शेतात काही पिकेनासे झालेय आणि पिकले तरी कवडीमोल भावाने विकले जातेय. अशा स्थितीत शेतजमीन हाच एकमेव आधार असलेल्या शेतकऱ्यांचे जमिनीवरून वाद होत आहेत आणि हे वाद सोडवण्याऐवजी पोलीस एका शेतकऱ्याकडून चिरीमिरी घेवून दुसऱ्या शेतकऱ्याच्या जीवावर उठलेत. पाण्याच्या एका एका थेंबासाठी तरासणाऱ्या दुष्काळग्रस्त मराठवाड्यातील लातूर जिल्ह्याच्या देवणी तालुक्यातील चावणहिप्परगा या गावात जमिनीच्या वादातून रमेश कांबळे या पोलिसाने गंगाधर कोतवाड या गरीब शेतकऱ्याला त्याच्या शेतात जावून मारहाण केली. ज्याच्याशी गंगाधरचा वाद होता त्याच्याकडून पैसे घेऊन रमेश कांबळे याने आपणास मारहाण केली असा आरोप कोतवाड यांनी केला असून या प्रकरणी तो देवणी पोलीस ठाण्यात रमेश कांबळे विरुद्ध फिर्याद नोंदवायला गेला असता त्याची फिर्यादी नोंदवण्यात आली नाही. त्यामुळे त्याने पोलीस अधीक्षकांकडे लेखी तक्रार केली असून या प्रकरणाची आता चौकशी सुरु झाली आहे, तर पोलीस आता शेतकऱ्यांच्या शेतात जावून त्यांना मारहाण करू लागल्याने शेतकऱ्यांमध्ये भीती आणि संतापाची लाट पसरली असून कोतवाडया शेतकऱ्याला मारहाण करणाऱ्या पोलिसाला तत्काळ निलंबित करून त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यांची मागणी शेतकरी करीत आहेत. कारण यापूर्वी लाभार्थी असलेली महिला तहसील कार्यालयात दाद मागायला गेली तिला तिथल्या कर्मचाऱ्यांनी तहसीलदारांच्या समोरच मारहाण केली आता सरकारी कर्मचारीच जर असे उद्दामपणे वागू लागले तर शेतकऱ्यांचे काय होणार?

लातुर जिल्ह्यात सध्या देवणी पोलीस ठाणे सारखे कोणत्या ना कोणत्या कारणांमुळे चर्चेत राहते. कारण गेल्या एक वर्ष भरामध्ये देवणी पोलीस ठाण्यात दोन पोलीस कर्मचाऱ्यांवर लाच घेताना रंगेहाथ लाच लुचपत प्रतिबंधक विभागाने पकडले. काही महिन्यापुर्वी जवळगा बिटचा दंतराव नावाच्या पोलीसावर व तसेच साधारण एक महिन्या अगोदर इद्रीस बागवान नामक पोलीसावर एसीबीने लाच घेताना रंगेहाथ पकडून सुद्धा देवणी पोलीस ठाण्यातील काही मोजक्या व भ्रष्ट पोलीसांना याचा तिळमात्र फरक पडला नाही. कारण देवणी पोलीस स्टेशनचा जर ठाणेदार कर्तव्यदक्ष, कार्यक्षम असेल तर ठाणेदाराच्या हाताखाली काम करणारे पोलीस पण लाच घ्यायला धजावतात! एवढे सतत कारनामे घडुन सुद्धा ठाणेदाराची बदली का होत नाही, नुतन कर्तव्यदक्ष पोलीस अधीक्षक निखील पिंगळे साहेबांनी देवणीच्या ठाणेदारांनी लातुर जिल्ह्यातील जिथे जिथे पोलिस ठाण्यात सेवा केली तिथे तिथे असताना मागील काळातील बरेच कारनामे घडले आहेत. ठाणेदाराच्या कर्तबगारीची खातेनिहाय किती चौकशा व कोण कोणत्या प्रकरणात झालेत याचा थोडा मागील इतिहास काढल्यावर, कर्तव्यदक्ष नुतन पोलीस अधिक्षक निखील पिंगळे साहेब यांच्या लक्षात येईल व या ठाणेदाराची तात्काळ बदली करण्यात यावी अशी मागणी देवणी तालुक्यातील सुजान नागरिकातुन बोलले जात आहे!

असाच एक गंभीर प्रकार देवणी तालुक्यातील चवणहिप्परगा शिवारात शेतकऱ्याला जवळगा बीटचे पोलीस कर्मचारी बंटी उर्फ रमेश कांबळे यांनी बेदम मारहाण केली. या प्रकरणी संबंधित पोलीस कर्मचाऱ्याची चौकशी करून निलंबित करण्यात यावे अशी मागणी शेतकऱ्याने निवेदनाद्वारे मंगळवार दि.३० मार्च रोजी जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्याकडे केली आहे. चवणहिप्परगा येथील शेतकरी गंगाधर कोतवाड यांची सर्वे नंबर ८१ मध्ये शेतजमीन आहे. शेत शेजारच्या शेतकऱ्यात व शेतकरी गंगाधर कोतवाड यांच्यात आर्थिक देवाणघेवाण वरुन वाद सुरू आहे. या प्रकरणी शेजारच्या शेतकऱ्यांची एकतर्फी बाजू मांडण्यासाठी चिरीमिरीच्या मोहापायी पोलीस कर्मचारी (बंटी) उर्फ रमेश कांबळे यांनी दि.२६ मार्च रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास अचानकपणे माझ्या शेतीत येऊन मला काठीने बेदम मारहाण केली. मला मारु नका असे मी व तेथे उपस्थित लोकांनी सांगितले मात्र त्यांनी कोणाचेही ऐकले नाही. माझ्यावर झालेला अन्याय मला सहन करणे कठीण झाले, या प्रकरणी मी मंगळवार दि.३० मार्च रोजी देवणी पोलीस ठाण्यात तक्रार दिली मात्र तेथील ठाणे अमलदार असलेले पोलीस कर्मचारी माझी तक्रार घेतली नाही. अशा आशयाचे निवेदन लातूर जिल्हा पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी निलंगा यांच्याकडे दिले आहे. तसेच या प्रकरणाचा तपास चालू असल्याचे देवणी पोलीसातुन नाव न घेण्याच्या अटीवर सांगितले आहे. या प्रकरणाचा तपास स्वतः कर्तव्यदक्ष पोलीस अधिक्षक साहेबांनी स्वतः करावा शेतकरी गंगाधर कोतवाड यांना न्याय मिळवुन द्यावा अशी मागणी सुजान नागरीकातुन होत आहे.

## आर्थिक व्यवहारातून मोठा वाद...

निंबाळ (वय ३२) रा. मल्लिकार्जुन गल्ली दुधनी यांनी दक्षिण पोलीस ठाणे अक्कलकोट येथे फिर्याद दिली आहे की, पती मयत रमेश शरणप्पा निंबाळ वय ४५ व्यवसायाने शेतकरी असून यावरच कुटुंबाची उपजीविका होती. दि १९ रोजी सकाळी ११.३० च्या सुमारास मी व पती मोटार सायकलवरून शेतातील लक्ष्मीचे दर्शन घरी परतत असताना गावातील रूपाभवानी मंदिराजवळ आमच्या ओळखीचे व नेहमी आमच्या घरी येणारे सैदप्पा चंद्रशा व्हसुरे हे आमची गाडी थांबवून पती रमेश यांना आपण केळी द्राक्षे आणायला जाऊ असे बोलू लागला. त्यावेळी पती रमेश त्यांच्या सोबत जाण्यास नकार दिल्याने आम्ही घरी आलो. त्यावेळी आमच्या पाठीमागे तो सुद्धा घरी आला. व पती रमेश यास बळजबरीने चल आपण जाऊ परत लवकर येऊ असे बोलून सैदप्पा याने स्वतःच्या दुचाकीवरुन घेऊन गेला. त्यानंतर दुपारी १२.३० च्या दरम्यान जेवण करण्यात बोलवण्यासाठी पती रमेश यांना फोनद्वारे संपर्क केले असता दोन्ही नंबर संपर्क क्षेत्राच्या बाहेर असल्याचे सांगत बंद दाखवले. सायंकाळी ४ च्या दरम्यान दीर लक्ष्मीपुत्र शरणप्पा निंबाळ, सुरेश शरणप्पा निंबाळ व गावातील लोकांनी सांगितले की पती रमेश निंबाळ वय ४५ यांचे कोणीतरी दुधनी ते बडदाळ जाणाऱ्या बैलगाडी रस्त्याला धारदार हत्याराने वार करून ठार मारल्याचे सांगितले. त्यावेळी माझी खात्री झाली की सैदप्पा चंद्रशा व्हसुरे यांनी माझे पती रमेश निंबाळ यांना दुधनी ते वडदाळ जाणाऱ्या बैलगाडी रस्त्याला नेऊन कोणी पाहणार नाहीत अशा ठिकाणी घेऊन जात धारदार हत्याराने ठार मारले आहे. म्हणून सैदप्पा चंद्रशा व्हसुरे (वय ४५)च्या विरोधात अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली असून संशयित सैदप्पा व्हसुरे याला अटक करण्यात आली आहे. मयताच्या पश्चात पत्नी दोन मुले असा परिवार आहे. घटनास्थळी सोलापूर ग्रामीणचे अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ संतोष गायकवाड, पोलीस निरीक्षक विजय जाधव भेट दिली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सी बी बेरड करीत आहेत.

## लंपटपणा अजयच्या चांगलाच अंगाशी ...

या गृहिणी आहेत. त्याचे वडिल विठ्ठल दुपटे याचे सन २००८ साली आजारपणात वारल्याने घरची सर्व जबाबदारी ही नागेश आणि अजय याच्यावरच होती. गावात बौध्द वस्तीत दुपटे लोकांची घरे जास्त आहेत. याच बौध्द वस्तीत सचिन दुपटे हा ही आपल्या पत्नी, आई वडिल आणि मुलीसह राहयला आहे.सचिन आणि अजय हे दोघे एकाच समाजाचे असल्याने त्याचेत भाऊबंदकीचे नाते होते. यातूनच अजय हा सचिनच्या घरी सारखा येत जात होता.याला कारण ही तसेच होते. अजयला सचिनची बायको संगिता (काल्पनिक नांव) ही आवडत होती. म्हणून तो सारखा सचिनच्या माघारी घरी येत जात असायचा. तो तिच्याशी लाडी गोडी लावीत वहिनी वहिनी म्हणून तिच्या मागे लाळ घोळीत होता. अजय हा भाऊबंदातील असल्याने संगितला सुरूवातीला त्याचे तिच्याशी बोलणे यात काही वावगे वाटत नव्हते. परंतू कालांतराने अजय हा संगिताबरोबर जास्तच लाडी गोडी लावत तिच्याशी जवळीकता साधत असल्याने तिने ही त्याच्या मनातील ओळखले होते. अजय हा खरे तर अविवाहित होता.ती विवाहिता आणि एका मुलीची आई होती.अजय हा तिच्याशी प्रेमसंबंध जोडू इच्छित होता. पण ती आता त्याच्यापासून लांबच राहण्याचा प्रयत्न करीत होती.परंतू अजयला ती आवडली असल्याने तो तिची पाठ सोडायला तयार नव्हात. नेहमी काही तरी कारण काढून तो सचिनच्या माघारी घरी जात होता. तिला चोरटा स्पर्श करीत होता. तिच्याशी अश्लिल आणि असभ्य भाषेत बोलून तिला लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन करीत होता. या सगळ्याला तीही कंटाळली होती. तिने अजयबाबत आपला नवरा सचिन याला सांगितले होते. त्यावेळी सचिन याने ही त्याच्या घरात जाऊन अजयला सक्त ताकीद दिलेली होती. त्याला आपल्या बायकोपासून दूर राहण्याचा सल्ला दिला होता.पण त्यावेळी अजयने, त्याच्या आईने व भावाने सचिन यालाच तुझ्या बायकोला समजावून सांग.तिच अजयला नादाला लावीत आहे असे सांगून सचिन व त्याच्या बायकोबरोबर भांडण काढले होते. त्यावेळी त्याचेत मारामारी ही झालेली होती.या घटनेवरून कराड तालुका पोलीस स्टेशनला दोघांनी ही परस्पर विरोधी तक्रारी दाखल केलेल्या होत्या. या घटनेनंतर सचिनने त्याच्या बायकोला या कारणातूनच तिच्या माहेरी पाठविले होते. जाताना ती आपल्या मुलीला ही त्यावेळी घेऊन गेली होती. भाऊकीतील काही लोक हे अजयच्या बाजूने ही होते. तर काही लोक अजयच्या बाजूने होते. त्यामुळे अजय हा गप्प बसला नव्हता. त्याला संगितला आपल्या नादी लावायचेच असल्याने तो ती माहेरी गेली तरी तिच्याशी फोन वरून संपर्क साधत होता. ती त्याला भाव देत नव्हती. म्हणून अजयने ही एकदा बेधडक तिचे माहेर गाठले होते. त्याने तिच्या माहेरात जाऊन तिच्या घराच्या भोवती घिरटया घातल्या होत्या. हे सचिनच्या मुलीने पाहिलेले होते. तर संगिताने ही त्याला त्यावेळी परत एकदा समजावून सांगून इकडे कशाला आला आहेस माझा संसार तू अगोदरच बदरबाद केले आहेस. असे सांगून अजयला पिटाळले होते. बाई एकदा का मनात भरली की काही जण ती रिस्पॉन्स त्यासाठी देवो अथवा न देवो तिच्यासाठी मग वाटेल ते धाडस करीत असतात. कारण त्यांना वाटत असते की ती आपल्याला लाईन देत आहे. फक्त ती कुणाला तरी म्हणजे तिच्या घरच्या लोकांना घाबरत आहे असा समज करून घेऊन ते तिच्या सारखे पाठ लागीत असतात. अजय हा तिच्या माहेरी जावून तिला त्रास देत होता. ही घटना ही संगिताने परत आपल्या नवऱ्याला सांगून माझे त्याचे काहीच संबंध नसताना तो परत माझ्या माहेरी येऊन मला त्रास देत आहे याची कल्पना दिली होती. याचा राग सचिन याला आलेला होता. तो याचा जाब अजय याला विचारू इच्छित होता. पण तशी संधी त्याला मिळालेली नव्हती. त्याला अजयला अद्दल घडावयचीच होती. कारण त्याच्यामुळे त्याचा संसार मोडला होता. बायको माहेरी गेली होती. भाऊबंदकीत ही त्याच्या अब्रुचे धिंडवडे निघाले होते. गुरूवार दि.१८ मार्च २०२१ रोजी सकाळी ७ वाजणेच्या सुमारास सचिन हा बौध्द वस्तीवरील नाईकबाचे दर्शन घेणेसाठी मंदिरात गेला असताना त्याला अजय दिसला. अजय ही सकाळ सकाळीच आपल्या जेसीबीवर कामावर जात होता. त्यावेळी सकाळीच सचिनने अजयला वाटेत अडवून तू माझ्या बायकोला तिच्या माहेरी जाऊन का त्रास देतो आहेस? असा जाब विचारला असता. अजयने त्याला शिवीगाळ करीत त्यालाच म्हटले मला का तू हे विचारीत आहेस. तुला काय करायचे ते कर. तुझ्या बायकोलाच तू जाऊन विचार ना याबाबत तिचे आणि माझे काय संबंध आहेत ते. अजयने हे म्हणाताच सचिन ही पिसाळला होता.तो त्याला मारण्याची संधी शोधतच होता. त्यातच वस्तीतील रमेश दुपटे याच्या घरासमोर लाकडे तोडून त्याचा ढिग लावल्याचे सचिनला दिसले.अगोदरच सचिनला त्याचा राग आलेला होता. तो पळत गेला आणि त्या लाकडाच्या ढिगातील एक जाड मोठे लाकूड घेऊन आला. आणि त्याने थांबलेल्या अजयच्या डोक्यावर, पाठीवर फटके मारायला सुरूवात केली. त्याला मारत असताना सचिन इतका बेभान झाला होता की त्याला कशाचे भान नव्हते. त्याचा चेहरा रागाने लालबुंद झाला होता. त्याचवेळी वस्तीवरील अशोक दुपटे,भारत दुपटे, गणेश दुपटे, नागेश दुपटे आणि सचिनचे वडिल लक्ष्मण दुपटे यांनी येऊन त्याच्या हातातील लाकूड काढून घेऊन सचिनला बाजूला ढकलून नेत बाजूला नेले होते. सचिन हा जास्तच रागात होता. त्याने अजयला त्याचे डोकीतून रक्त येईपर्यत मारले होते. त्यातच त्याच्या डोकीत, मानेवर आणि पाठीवर मारहाण झाल्याने तो घटनास्थळीच पडला होता. त्याच्या डोकीला मारहाणीमुळे मोठी जखम झालेली होती. त्यातून रक्त येत होते. मंदिरा समोर घडलेली ही घटना अजय याचा चुलत भावाचा मुलगा गणेश दादासो दुपटे याने अजय याच्या घरी जाऊन सांगितले असता अजयचा लहान भाऊ नागेश आणि त्याचे मित्र घटनास्थळी पळत आले. नाईकबा मांदिरा जवळ त्याचा भाऊ अजय हा जखमी अवस्थेत रक्तबंबाळ होऊन पडला होता. त्याने अजयला कुणी मारले असे विचारले असता अजयने सचिन दुपटे याने मारहाण करून जखमी केल्याचे सांगून तो लगेच बेशुध्द पडला. त्याचवेळी नागेशला सचिनला त्याचे वडिल आणि भावकीतील काही लोक ढकलून नेत असल्याचे दिसले. त्यावेळी नागेश याने गावातील त्याचा मित्र संदीप पाटील यांची चार चाकी गाडी बोलावून घेतले. आणि त्या गाडीत घालून जखमी अजय याला मलकापूर येथील कृष्णा हॉस्पिटल येथे उपचारासाठी नेले. तसेच या घटनेची माहिती कराड तालुका पोलीस स्टेशनला गावचे पोलीस पाटील जयवंत पाटील यांनी दिली. कराड तालुका पोलीस स्टेशनचे पोलीस ही तातडीने या घटनेची माहिती मिळताच आटके गावातील बौध्द वस्तीवरील घटनास्थळी दाखल झाले होते.त्यांनी घटनास्थळाची माहिती घेऊन या घटनेचा पंचनामा केला. पोलीसांना या घटनेविषयी जखमी अजय दुपटे याचा भाऊ नागेश याने माहिती देऊन या घटनेतील संशयीत आरोपी सचिन दुपटे याचे नाव सांगितले. त्याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी सचिन दुपटे याच्या विरोधात गुन्हा दाखल केला. त्याचप्रमाणे कृष्णा हॉस्पिटल मलकापूर येथे जाऊन जखमी अजयची विचारपूस केली. दरम्यान या घटनेचा तपास चालू असताना दि.२१ मार्च २०२१ रोजी जखमी अजय दुपटे याचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला.गावातील संवेदनशील परिस्थिीती बघून कराड तालुका पोलीसांनी आटके गावात तगडा पोलीस बंदोबस्त लावलेला होता. यातच जखमी अजयचा मृत्यू झाल्याने वातावरण चिघळण्याची शक्यता ही होती.

म्हणून पोलीसांनी त्या अगोदरच या घटनेतील संशयीत आरोपी सचिन दुपटे याला ताब्यात घेतले होते.परंतु मयत अजयकडील लोकांनी या घटनेतील दुसरे आरोपी म्हणजे सचिनचे वडिल लक्ष्मण दुपटे यांना ही अटक केल्याशिवाय अजयचा मृतदेह ताब्यात घेणार नसल्याचे सांगून कराड तालुका पोलीस स्टेशनवर मोर्चा काढला.दरम्यान या घटनेतील संशयीत आरोपी सचिन दुपटे याच्या घराशेजारी पोलीस बंदोबस्त लावलेला असताना त्याचे घर कुणी तरी अज्ञातांनी पेटवून दिले होते.त्यामुळे त्याच्या घराला आग लावलेली होती काही ग्रामस्थांनी ऊसाच्या शेतीतील पाण्याच्या इरीगेशनमधून पाईपने पाणी आणून आग विझविण्याचा प्रयत्न केला होता.परंतू ही आग मोठी असल्याने कराड नगरपरिषदेच्या अग्न शमन दलाने येऊन विझविली,तरी या आगीत घराचे फार मोठे नुकसान झाले होते.या घटनेची फिर्याद लक्ष्मण दुपटे यांनी मयत अजय दुपटे याच्याकडील लोकांच्या विरोधात पोलीसात दिल्याने परस्पर विरोधी तक्रारी दाखल झाल्या.

या घटनेतील संशयीत आरोपीला पोलीसांनी अटक करून ताब्यात घेतल्यावर त्याचेकडे पोलीसांनी चौकशी केली असता.त्याने मयत अजय हा आपल्या पत्नीची छेड काढीत असल्याने त्याला आपण लाकडाने मारहाण केल्याचे कबुल केले होते.नागेश दुपटे याच्या फिर्यादीवरून पोलीसांनी अजय विठ्ठल दुपटे (वय ३१) याच्या मृत्यू प्रकरणी कराड तालुका पोलीस स्टेशनमध्ये सुरूवातीला गु. रजि. नं.१५५/२०२१ भा.दं.वी.कलम ३०७ प्रमाणे गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर या गुन्हयात वाढ करून कलम ३०२,२०१ लावले होते. पोलीसांनी सचिन दुपटे याला कराड येथील न्यायालयात उभे केले असता मा.न्यायालयाने त्याला पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. या घटनेचा तपास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.रणजित पाटील वरिष्ट पोलीस निरीक्षक बाळासाहेब भरणे याच्या मार्गदर्शनाखाली पो.फौजदार अशोक भापकर, उदय दळवी, राजू डांगे, सहा.फौ.प्रशांत एक्के, वसंत जाधव, पो.हवा.विकास सपकाळ,धनजय कोळी व पो.काँ. अमोल पवार तसेच स्थानिक गुन्हे अन्वेशनचे पो.ना.शशिकांत काळे, अमित पवार,सज्जन जगताप, पो.काँ. शशिकांत घाडगे, गोकुळ हादगेव, चालक सहा.फौ.सुनिल तोडकर व चंद्रकात संपकाळ यांनी केला. केवळ विवाहितेच्या छेडछाडीतून कुठली घटना कुठे गेली होती. त्यात छेड काढणारा अजय दुपटे याचा खून झाला. तर त्याच्या समाजातील काही विघ्नसंतोषी मंडळीनी संशयीत आरोपी सचिन दुपटे याच्या घराला आग लावली. त्यामुळे या घटनेचे गांर्भिय आणखीनच वाढले आहे. काही पुरूष विवाहित महिलेला विनाकारण आपल्या नादी लावण्याचा प्रयत्न करून तिच्याशी प्रेमसंबध प्रस्थापित करू पाहतात. आणि वहिनी वहिनी म्हणत तिला गळाला लावतात. परंतू या घटना या सहसा नजरेआड होत नाहीत त्यातूनच अशी प्रकरणे पुढे जावून विकोपाला जातात आणि अघटित अशी घटना घडते. बाईचा, घोडयाचा आणि पाण्याचा कधीच अंदाज लागत नाही असे म्हणातात ते बरोबर आहे ज्याला प्रेम समजतो ते कदाचित एकतर्फी ही असू शकते हेच या घटनेवरून दिसून येते.

## बलात्कार आणि हत्या होताच रक्ताचा ...

सजग नागरिकांच्या हस्तक्षेपानंतर या प्रकरणी ऋखठ दाखल करण्यात आलीय. पीडित महिलेवर ३१ मार्च रोजी दुपारी बलात्कार करण्यात आला. एका रिक्षाचालकाने हे कृत्य केल्याचा संशय आहे. पीडित महिला (वय ४२) घरी लग्न असल्याने आपल्या नवऱ्याला वीटभट्टीवरुन आणण्यासाठी सकाळी १० च्या दरम्यान जवळच्या गावातील रिक्षा भाड्याने घेऊन निघाली. मात्र, ती आपल्या नवऱ्यापर्यंत पोहचलीच नाही. बऱ्याच उशिराने दुपारी २ च्या दरम्यान संबंधित रिक्षाचालक वीटभट्टीवर तिच्या नवऱ्याकडे गेला. तुझी बायको तुला न्यायला आली आहे आणि मालक सुट्टी देणार नाही म्हणून इथं न येता पुलाखाली थांबली आहे तर तू पटकन आवरून चल असं तो म्हणाला. नवरा जेव्हा १०० मीटर अंतरावरील पुलाखाली पोहोचला तेव्हा त्याला कडेच्या झुडुपात बायको बेशुद्धावस्थेत पडलेली आढळली. पीडितेच्या नवऱ्याने त्या रिक्षा चालकास बायकोला दवाखान्यात नेऊ असे म्हटले. मात्र रिक्षा चालकाने मला काम आहे सांगून तिथून पळ काढला. त्यानंतर पीडितेला वीटभट्टी मालकाच्या गाडीतून दवाखान्यात नेण्यात आले. या ठिकाणी महिला मृत असल्याचे निष्पन्न झाले. पीडितेच्या नवऱ्याने तिला हेमडी या गावी अंत्यसंस्कारासाठी आणले. मात्र गावातील महिलांनी मृत महिलेस तपासले असता तिच्या अंगावर अंतर्वस्त्रे नव्हती, गुप्तांगाला सूज आलेली होती आणि विर्यसदृश्य द्रव तिथे सांडल्याचे आढळले. तसेच अंगावरील साडी नेसली नसून गुंडाळलेली दिसली. यावरून बलात्कार झाल्याचे लक्षात आले. त्यामुळे हे कृत्य रिक्षावाल्यानेच केल्याचा संशय आला यानंतर रात्री १० वाजता पीडितेचा पती आणि इतर लोक महिलेला घेऊन पोस्टमार्टमसाठी खालापूर प्राथमिक आरोग्य केंद्रात आले. मात्र, डॉक्टर नसल्याने त्यांना सकाळी ९ वाजता या असे सांगण्यात आले. त्याचवेळी ते खालापूर पोलीस स्टेशनमध्ये तक्रार दाखल करण्यास गेले. मात्र, पोलिसांनी बलात्कार व खून अशी एफआयआर दाखल न करता महिला चक्कर येऊन मृत पावली असा एक्सिडेंटल डेथ रिपोर्ट लिहून घेतला. अखेर सामाजिक कार्यकर्ते सचिन आशा सुभाष यांनी १ एप्रिल रोजी पीडितेच्या कुटुंबीयांसोबत पोलीस ठाण्यात जाऊन तक्रार दाखल करण्यासाठी पाठपुरावा केला. मात्र, पोलिसांनी टाळाटाळ करत उडवाउडवीची उत्तरं दिली. अखेर गावकऱ्यांनी तक्रार दाखल करा अन्यथा मृतदेह ताब्यात घेणार नाही अशी भूमिका घेतली. त्यानंतर पोलीस एफआयआर घ्यायला तयार झाले. हे सगळं होईपर्यत दुपारी १ वाजले होते. मृत्यू होऊन २४ तास आणि शवविच्छेदनासाठी मृतदेह दवाखान्यात आणून १४ तास उलटले. त्यानंतरही सरकारी रुग्णालयात पोस्टमार्टमसाठी डॉक्टर हजर नव्हते.

अखेर पेण येथील काँग्रेस पदाधिकारी नंदा म्हात्रे यांनी पाठपुरावा करत पोस्टमार्टम करुन घेतला. मृत्यू होईन २४ तास उलटून गेल्याने शरीर फुगून त्यात अळ्या पडल्या होत्या आणि प्रचंड वास सुटला होता, अशी माहिती म्हात्रे यांनी दिली. या घटनेवर बोलताना सचिन आशा सुभाष म्हणाले, जेव्हा इतर ठिकाणी बलात्कार होतात तेव्हा मोर्चे निघतात, बातम्या होतात पण इथे एका आदिवासी महिलेचा बलात्कार होऊन खून झाला तरी साधा गावचा सरपंच, पोलीस पाटील देखील अंत्यसंस्काराला नसतो ही लाजिरवाणी बाब आहे. मीडिया तर सोडा पण सोशल मीडियावर देखील याविषयी काहीच चर्चा होत नाही. आदिवासी कधी आणि कसा जन्मतो आणि कधी आणि कसा मरतो याकडे कुणाचंच लक्ष नसतं हे दुर्दैवाने वास्तव आहे. साधा FIR व्हायला १८ तास वाट पाहायला लागते तर न्याय मिळणं खूप अवघड बाब आहे. आम्ही मदतीला गेलो नसतो तर हे प्रकरण ऋखठ न होताच चक्कर येऊन मृत्यू जाहीर करून निकाली निघालं असतं. तसेच गुन्हेगार अजून एक बलात्कार आणि खून करायला मोकाट सुटला असता. ज्याच्या पाठीमागे कोणी नाही त्याच्या पाठीमागे व्यवस्था पण नाही हे वास्तव आहे, असंही सचिना आशा सुभाष यांनी नमूद केलं. या प्रकरणाची तक्रार दाखल करायला गेलेल्या एका कातकरी समाजाच्या नागरिकाने यावेळी पोलिसांच्या केबिनमधून बाहेर निघताना पोलीस अधिकाऱ्यांना हात जोडून साहेब, एक विनंती आहे आम्हा आदिवासी लोकांना पोलीस स्टेशनात नीट वागणूक मिळत नाही. आम्ही पण माणसंच आहोत आम्हाला नीट वागणूक मिळावी अशी विनंती केली. त्यावर हसत एका अधिकाऱ्याने काय करणार, सगळ्या महाराष्ट्रात असंच आहे असं म्हणत उत्तर दिल्याची माहिती सचिन आशा सुभाष यांनी दिली.

पान ८ वरून....

## वीजबिलांची दुरुस्ती करा अन्यथा...

अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. सुदैवाने यावर्षी पाणी उपलब्ध असले तरी महावसुली सरकारच्या कारभारामुळे हे पाणी पिकांना देणे शेतकर्यांना शक्य होत नाही. त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी काही दिवसांपूर्वी सर्व समाजघटकांच्या मनाला वेदना देणार्या या वाढीव वीजबिलांची होळी करण्याचे आवाहन करून महाविकास आघाडी सरकारच्या विरुध्द बोंबा माराव्यात असे सांगितले होते. सध्या कोरोनाच्या संसर्गाने पुन्हा एकदा डोके वर काढले असल्यामुळे हे आंदोलन प्रत्येकाने आपापल्या घरातच करून त्याचे छायाचित्र व चित्रिकरण सोशल मिडियावर टाकावीत असेही आ. निलंगेकर यांनी यावेळी स्पष्ट केले होते. काल होळी पौर्णिमेनिमित्ताने माजी पालकमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांच्या आवाहानानुसार संपूर्ण जिल्ह्यात भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपापल्या परिसरात वीजबिलांची होळी करून महाविकास आघाडी सरकारविरुध्द बोंब मारली. आ. निलंगेकरांनी निलंग्यात या वीज बिलांची होळी करत सरकारने आगामी १५ दिवसांत वीज बिलांची दुरुस्ती करून मगच वसुंली करावी असा इशारा देऊन ही मागणी पूर्ण न झाल्यास आंदोलन छेडण्यात येईल, असेही सांगितले आहे. सध्या कोरोनामुळे आम्ही हे आंदोलन आपापल्या परिसरातच करीत असलो तरी आघाडी सरकारने याकडे दुर्लक्ष करू नये असे स्पष्ट करून आम्हाला जनतेची काळजी असल्यामुळेच आम्ही ही आंदोलने सीमीत स्वरूपात करत असून आगामी काळात या सरकारला जाग न आल्यास नाईलाजास्तव रस्त्यावर उतरावे लागेल, असा इशारा आ. निलंगेकरांनी दिला. यावेळी भाजपा शहराध्यक्ष वीजभद्र स्वामी, नगराध्यक्ष बाळासाहेब शिंगाडे, शेषेराव ममाळे, वैभव पाटील, उपनगराध्यक्ष मनोज कोळ्ळे, किशोर लंगोटे, अंकुश ढेरे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## भिवंडीत मुला-मुलींच्या वसतीगृहास...

प्रशिक्षण दिले जात आहे. या आगीचे नेमकी कारण अजून स्पष्ट नसले तरी शॉर्ट सर्किटने आग लागल्याचे बोलले जात असून, अग्निशामक दलाच्या जवानांनी या सर्व प्रशिक्षणार्थींची सुखरूप सुटका स्थानिकांच्या मदतीने केली परंतु या आगीत सर्व प्रशिक्षणार्थींचे कपडे अत्यावश्यक साहित्य या आगीत पूर्ण जाळून खाक झाले आहे. स्थानिकांनी या सुटका केलेल्या सर्वाना नजीकच्या अरहम लॉजेस्टिक कार्यालयात बसविल्या नंतर रात्री त्यांच्या जेवण व राहण्याची व्यवस्था स्थानिकांच्या मदतीने नजीकच्याच प्रेसिडेन्सी स्कुल या ठिकाणी करण्यात आली असून यासाठी पडघा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिनेश कटके यांनी देखील धाव घेत विद्यार्थ्यांच्या जेवण व राहण्याची व्यवस्था केली आहे.

## शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या वर्धा ...

विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी पंढरी मध्यम (वर्धा ड्रायव्हर्शन) प्रकल्पाचा अभ्यास करून हा प्रकल्प शेतकऱ्यांसाठी जीवनदायी ठरणारा असल्याची खात्री पटल्याने त्या दिशेने अविरत प्रयत्न करून शासनदरबारी सातत्याने पंढरी मध्यम ( वर्धा डायव्हर्शन) प्रकल्पाचा मुद्दा रेटून धरला. त्यामुळे वर्धा ड्रायव्हर्शन पंढरी मध्यम प्रकल्पा करीता १ हजार १०९ कोटी २३ लक्ष रुपयांची सुधारीत प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यामध्ये प्रकल्पाचे उर्वरित संपूर्ण बांधकाम प्रकल्पाची घळभरणी जून २०२१ पर्यत पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या प्रकल्पामध्ये या वर्षीच्या पावसाळ्यात ८० ते ९० टक्के पाणी साठा निर्माण होईल. पंढरी मध्यम वर्धा ड्राय व्हर्शन प्रकल्पाचे राहिलेले अपूर्ण काम बंदिस्त नलिकेद्वारे शेतकऱ्यांच्या बांधावर पाणी पोहचविण्याचे काम केले जाणार असून वरुड तालुक्यातील ४० गावातील ९ हजार १९१ हेक्टर क्षेत्र बंदिस्त नलिकेद्वारे सिंचन केले जाणार आहे. या प्रकल्पाच्या डाव्या मुख्य कालव्यामधून ४४४ हेक्टर क्षेत्र आणि उजव्या मुख्य कालव्यामधून ८७४७ हेक्टर क्षेत्र असे एकून ९ हजार १९१ हेक्टर सिंचन क्षेत्र निर्माण होणार असून या कालव्याद्वारे वितरित करण्यात येणाऱ्या पाण्याचे योग्य नियोजन करून पाणी वाटप संस्था निर्माण करून शेतकऱ्यांना पाणी वितरित करण्याचे नियोजन करण्यात आले आहे. दहा वर्षापासून रखडलेल्या (वर्धा ड्रायव्हर्शन) पंढरी मध्यम प्रकल्प पूर्णत्वास नेण्याकरिता आमदार देवेंद्र भुयार यांच्या प्रयत्नाने निवडून आल्यानंतर पहिली बैठक दि. १९/१२/२०१९ रोजी त्री सदस्य उपसमितीची बैठक मुंबई येथे लावून प्रकलाचे काम मार्गी लावण्याची सुरुवात केले. त्यानंतर पाट बंधारे नियामक मंडळ यांची २०/०१/२०२० रोजी बैठक होऊन त्यामध्ये सदर प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास मंजुरी प्रदान करून कार्यकारी संचालक विदर्भ पाट बंधारे विकास महामंडळ नागपूर यांच्याकडे प्रस्ताव पाठविला . त्यानुसार विदर्भ पाट बंधारे विकास महामंडळ नागपूर यांनी २३/३/२०२० चे बैठकीमध्ये मान्यता देऊन सदर प्रस्ताव मान्यतेकरिता शासनाकडे सादर केला दिनांक १३/१०/२०२० रोजी जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात बैठक घेऊन सादर प्रकल्पाच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या प्रस्तावास शासनाच्या मान्यतेसाठी ठेवण्याबाबत संबंधितांना निर्देश दिले त्यानुसार दिनांक २४/३/२०२१ च्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये पंढरी मध्यम प्रकल्प वर्धा ड्राय व्हर्शन प्रकल्पाला १ हजार १०९ कोटी २३ लक्ष रुपयांच्या सुधारित प्रशासकीय मान्यतेस मंजुरी प्रदान करण्यात आली. दरम्यान शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारा पंढरी मध्यम वर्धा ड्रायव्हर्शन सिंचन प्रकल्प पूर्णत्वास नेण्याकरिता शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी मला सतत प्रोत्साहन देऊन वेळोवेळी येणाऱ्या प्रशासकीय अडचणी सोडविण्यासाठी सतत मार्गदर्शन करून मला प्रोत्साहित केले त्यामुळे वरुड मोर्शी तालुक्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्णत्वास नेण्याचा निर्णय घेवून वरुड मोर्शी तालुका दुष्काळमुक्त करण्याचा संकल्प केला. मोर्शी मतदार संघातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्णत्वास नेण्याकरिता मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार जलसंपदा मंत्री जयंत पाटील यांनी माझ्या मागणीची दखल घेऊन पंढरी मध्यम वर्धा ड्राय व्हर्शन प्रकल्प पूर्णत्वास नेण्याकरिता सन २०२०-२१ च्या अर्थसंकल्पात १ हजार १०९ कोटी २३ लक्ष रुपयांच्या कामास सुधारित प्रशासकीय मंजुरात देऊन निधीची तरतूद केली.

## लातूर शहर अस्वच्छतेच्या विळख्यात...

पध्दतीचा अवलंब करून शहरातील प्रभाग क्र.१८ मधील माताजी नगर पसिरातील नालीची स्वच्छता करून स्वच्छ आणि सुंदर लातूर करण्याचा संदेश विद्यमान महापौरांना दिलेला आहे. त्यांच्या या विधायक कृतीचा आदर्श इतर नगरसेवकासाठी प्रेरणादायी ठरणार आहे. शहरातील १८ प्रभागातील स्वच्छतेचे कामे करण्यासाठी प्रत्येक प्रभागात पूर्णवेळ पंधरा ते वीस स्वच्छता कर्मचार्याची टिम तयार करण्यात आली. भाजपाची सत्ता असताना या स्वच्छतेच्या टिमबरोबरच एक वेगळी ७० स्वच्छता कर्मचार्याची हमला टिम तयार करण्यात आली. व ती टिम शहरातील सर्वच प्रभाग व वार्डामध्ये जाऊन स्वच्छतेचे काम करीत असे या कामातील सातत्यामुळे लातूर शहरातील स्वच्छतेची नोंद केंद्र शासनाने घेतली. आणि त्या वेळी लातूर महानगरपालिकेला देशात पहिला स्वच्छतेचा पुरस्कार मिळाला ही बाब लातूरकरांसाठी स्वाभिमानाची बाब आहे. परंतु नंतर झालेल्या महानगरपालिकेतील सत्ताबदलानंतर काँग्रेसच्या हातात मनपाची सत्ता गेली. परंतु त्यानंतर त्यांनी शहरातील स्वच्छतेकडे म्हणावे तसे लक्ष दिलेले नाही. त्यामुळे पुन्हा शहरातील स्वच्छतेचा प्रश्न ऐरणीवर आलेला आहे. जागोजागी कचर्याचे ढिग, नालीही तुंबलेल्या दिसून येत असल्यामुळे लातूकरांच्या आरोग्याचा गंभीर बनलेला आहे. याबाबत शहरातील अनेक नगरसेवकांनी महापौरांच्या नजरेस आणून देण्याचे काम केलेले आहे. शहरातील सर्वच प्रभागातील स्वच्छतेचा प्रश्न ऐनवेळी मार्गी लावणारी ७० जणांची हमला टिमही बंद करण्यात आलेली आहे. त्यामुळे शहरातील स्वच्छतेचा प्रश्न नागरिकांनी मांडायचा तरी कोणाकडे, असा सवाल उपस्थित केला जात आहे. हे वास्तव असले तरी शहरातील स्वच्छतेच्या प्रश्नांबाबत लक्ष द्यायला विद्यमान महापौरांना वेळच नाही. त्यामुळे शहरातील नागरिकांच्या अडचणी लक्षात घेवून भाजपा युवा नेते तथा नगरसेवक अजितसिंह पाटील कव्हेकर यांनी गांधीगिरी पध्दतीचा अवंलब करून शहरातील प्रभाग १८ मधील माताजी नगर परिसरात स्वतः पुढाकार घेवून या भागातील नाल्यांची स्वच्छता केली. यावेळी त्यांच्या समवेत संतोष जाधव, गोविंद सुर्यवंशी, महादेव पिटले यांच्यासह भाजपाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्याची या सामाजिक कार्यासाठी सक्रीय उपस्थिती होती.

### निम्म्या कर्मचाऱ्यांवरच स्वच्छतेचा भार

शहरातील प्रत्येक प्रभागातील स्वच्छतेसाठी पंधरा ते वीस कर्मचाऱ्यांची टिम असते. परंतु त्यातीलही तीन-चार कर्मचारी गैरहजर असतात. त्यामुळे आहे त्या तुटपुंज्या कर्मचार्यावर त्या-त्या प्रभागातील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लावावा लागतो. यामुळे आहे त्या कर्मचार्यावर अतिरिक्त ताण पडतो. याकडे मनपाचे लक्ष नाही. त्यातच ऐनवेळी येणारी ७० जणांची हमला टिमही बंद करण्यात आली असल्यामुळे लातूर शहर पुन्हा दुर्गंधीच्या विळख्यात येत असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे लातूर महानगरपालिकेने लक्ष देवून वाढीव कर्मचारी घेवून तसेच ७० जणांची हमला टिम सक्रीय करून स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लावावा, अशी मागणी भाजपा युवा नेते अजितसिंह पाटील कव्हेकर यांनी केली आहे.

## लक्ष्मण पवार यांना राज्यस्तरीय ...

व इतर उपक्रम राबविण्यात आले. याची दखल घेऊन लक्ष्मण पवार यांना ग्रामविकास विभागाच्यावतीने प्रशस्तीपत्र देऊन यथोचित सत्कार करण्यात येणार आहे.

05 TO 11 APRIL 2021 - Page 7 (CRIME SANDHYA):Layout 1 03/04/2021 9:06 PM Page 1



## भिवंडी शहरातील हवालदार अनिल शिरसाट १६ वर्ष भिवंडीतच तळ ठोकून

**भिवंडी/प्रतिनिधी**

भिवंडीतील पोलीस दलात हवलदार अनिल शिरसाट हे गेल्या १६ वर्षापासून भिवंडीत तळ ठोकून असून प्रथम भोईवाडा पोलीस ठाण्यात नंतर निजामपुरा पोलीस ठाणे आणि पुन्हा भोईवाडा पोलीस ठाणे इथं आपल्या मर्जी प्रमाणे कर्तव्यावर आहेत,भिवंडी शहरात चालणाऱ्या मटका जुगार, मोठमोठे क्लब, रात्रीच्या चालणाऱ्या खानावळी, बार, लॉजेस, गुटखा, वेश्याव्यवसाय, केमिकल गोदामे, गावठी दारू, ट्रान्सपोर्ट यांचा पोलिस अधिकाऱ्यांच्या नावाने हप्ता वसूल करण्याचे काम, भागीदारी अनिल शिरसाठ करत आहे असे आरोपी अनेक वेळा करण्यात आले. तर अनिल शिरसाट रुपी एक पैसे जमा करून देण्याच मशीन उपलब्ध असल्यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकारी त्याच्या डोक्यावर वरदहस्त ठेवत आहे. गेली सोळा वर्ष भिवंडीत त्यांच्या निवडीचे पोलीस ठाणे मिळवून त्यांची सायकल चालू आहे. हप्ता वसूल करून मिळालेल्या संपत्तीच्या जोरावर त्याचा भिवंडी शहरात राजकीय हस्तक्षेप वाढला आहे तर राजकीय पुढऱ्यांचे वरदहस्त मिळवून काही व्यापारी लोकांना त्रास देण्याचे काम करत आहे. यांच्या विरुद्ध अनेक नागरिकांनी पोलीस संचालक, पोलीस वरिष्ठ अधिकारी यांच्याकडे तक्रारी करून देखील त्यांच्यावर पोलिस विभागाने अद्याप कारवाई केलेली नाही, त्यामुळे अशा भिवंडी शहरातील सचिन वाझे सारखा अनिल शिरसाठ असल्याने भिवंडी पोलिसांची भविष्यात बदनामी होऊ नये यासाठी वेळीच योग्य कारवाई करावी अशी मागणी नागरिक, व्यापारी वर्ग करत आहे.

### केंद्र शासनामार्फत दिले जाणारे राष्ट्रीय पंचायत पुरस्कार जाहीर

## सातारा जिल्हा परिषद, गडहिंग्लज आणि राहाता पंचायत समित्यांसह १६ ग्रामपंचायतींना विविध गटांमध्ये पुरस्कार

**मुंबई/प्रतिनिधी**

केंद्र शासनामार्फत दिले जाणारे राष्ट्रीय पंचायत पुरस्कार जाहीर झाले असून यामध्ये राज्यातील सातारा जिल्हा परिषद, गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) आणि राहाता (जि. अहमदनगर) या दोन पंचायत समित्यांसह राज्याच्याविविध भागातील १६ ग्रामपंचायतींनी विविध गटांमध्ये पुरस्कार मिळवत उत्तूंग कामगिरी केली असल्याची माहिती ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांनी दिली. पुरस्कार विजेत्या सर्व पंचायत राज संस्थांचे मंत्री मुश्रीफ यांनी अभिनंदन केले आहे.

दीनदयाळ उपाध्याय पंचायत सशक्तीकरण पुरस्कार २०२१ (पडताळणी वर्ष २०१९-२०) हा राज्यातून सातारा जिल्हा परिषदेला आणि गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) व राहाता (जि. अहमदनगर) या दोन पंचायत समित्यांना तसेच मान्याचीवाडी (ता. पाटण, जि. सातारा), चंद्रपूर (ता. राहाता. जि. अहमदनगर), लोहगाव (ता. राहाता. जि. अहमदनगर), जाखोरी (ता. जि. नाशिक), गोवरी (ता. मौदा, जि. नागपूर), नागोसली (ता. इगतपुरी, जि. नाशिक), येनीकोनी (ता. नरखेड, जि. नागपूर), मरोडा (ता. मूल, जि. चंद्रपूर), तमनाकवाडा (ता. कागल, जि. कोल्हापूर), लेहेगाव (ता. मोर्शी, जि. अमरावती), वांगी (ता. कडेगाव, जि. सांगली), देगांव (ता. वाई, जि. सातारा), अंजनवेल (ता. गुहागर, जि. रत्नागिरी) आणि पीरगयबवाडी (ता. घनसावंगी, जि. जालना) या १४ ग्रामपंचायतींना जाहीर झाला. सातारा जिल्हा परिषदेला ५० लाख रुपये, गडहिंग्लज (जि. कोल्हापूर) आणि राहाता (जि. अहमदनगर) या पंचायत समित्यांना प्रत्येकी २५ लाख रुपये आणि १४ ग्रामपंचायतींना लोकसंख्येप्रमाणे ५ ते १५ लाख रुपयांपर्यंतची रक्कम पुरस्कार स्वरुपात प्राप्त होईल, अशी माहिती मंत्री श्री. मुश्रीफ यांनी दिली.

नानाजी देशमुख राष्ट्रीय गौरव ग्रामसभा पुरस्कार २०२१ हा राज्यातून मान्याचीवाडी (ता. पाटण, जि. सातारा) या ग्रामपंचायतीने पटकावला. या ग्रामपंचायतीस १० लाख रुपये रक्कम पुरस्कार स्वरुपात प्राप्त होईल. ग्रामपंचायत विकास आराखडा पुरस्कार २०२१ हा राज्यातून लोणी बुद्रुक (ता. राहाता, जि. अहमदनगर) या ग्रामपंचायतीने पटकावला. या ग्रामपंचायतीस ५ लाख रुपये रक्कम पुरस्कार स्वरुपात प्राप्त होईल. बालसुलभ ग्रामपंचायत पुरस्कार २०२१ हा राज्यातून सिरेगाव (ता. अर्जुनी मोरगाव, जि. गोंदिया) या ग्रामपंचायतीने पटकावला. या ग्रामपंचायतीस ५ लाख रुपये रक्कम पुरस्कार स्वरुपात प्राप्त होईल, अशी माहिती मंत्री श्री. मुश्रीफ यांनी दिली. पुरस्कारप्राप्त जिल्हा परिषद, पंचायत समित्या आणि सर्व ग्रामपंचायतींचे पदाधिकारी, अधिकारी, कर्मचारी आणि ग्रामस्थांचे मंत्री श्री. मुश्रीफ यांनी अभिनंदन केले, तसेच त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. राज्यातील इतर ग्रामपंचायतींनीही यंदाच्या वर्षी हे पुरस्कार मिळविण्याच्या दृष्टीने विविध योजना, उपक्रमांची आपल्या कार्यक्षेत्रात यशस्वी अंमलबजावणी करुन आदर्श कामगिरी करावी, असे आवाहन मंत्री श्री. मुश्रीफ यांनी केले.

## विशाखा समितीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी टास्क फोर्स नेमणार -ॲड.यशोमती ठाकूर



**मुंबई/प्रतिनिधी**

राज्यातील सर्व नोंदणीकृत आस्थापना, कारखाने, कंपनी, संघटित असंटित क्षेत्रामध्ये कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळ केल्याच्या घटना घडतात. या छळापासून संरक्षण व्हावे, यासाठी आलेल्या तक्रारींची वेळीच दखल घेणे गरजेचे असून सर्व विभागांनी नियमानुसार उचित कार्यवाही करावी, असे निर्देश देऊन विशाखा समितीच्या प्रभावी अमंलबजावणीसाठी टास्क फोर्स नेमणार असल्याचे महिला व बालविकास मंत्री ॲड. यशोमती ठाकूर यांनी संबंधित अधिकाऱ्यांच्या आयोजित बैठकीत सांगितले. कामाच्या ठिकाणी महिलांची छळवणूक, अत्याचार रोखण्यासाठी असलेल्या विशाखा समितीच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आज बैठक झाली. यावेळी प्रधान सचिव आय ए कुंदन, कामगार विभागाच्या सचिव विनिता वेद तसेच सामान्य प्रशासन, उद्योग, उर्जा, सहकार विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. तक्रारींची चौकीशी करण्यासाठी सर्व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी यांना याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहे. सर्व जिल्ह्यांमध्ये स्थानिक स्तरावर तक्रार समिती गठित करण्यात आली आहे. प्रत्येक जिल्ह्यांचे उपजिल्हाधिकारी यांनी या नियोजनासाठी एक समन्वय अधिकारी निवडावा व त्यांच्या कार्यक्षेत्रातील लैंगिक छळाच्या तक्रारी प्राप्त करुन संबंधित स्थानिक तक्रार समितीकडे पाठवाव्यात. याबाबतचा अहवाल संबंधित जिल्हाधिकारी यांना सादर करुन त्यांनी तो अहवाल महिला व बालविकास विभागास प्रत्येक वर्षाच्या ३० एप्रिलपूर्वी सादर करावा अशी तरतूद नियमानुसार असून याबाबतची सर्व कार्यवाही नियमानुसार करावी, असे निर्देशही ॲड.ठाकूर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना बैठकीत दिले. कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम २०१३ अंतर्गत विशाखा समिती नेमणे अनिवार्य आहे. शासकीय तसेच खासगी कार्यालयात विशाखा समितीच्या माध्यमातून महिलांना न्याय मिळावा यासाठी कठोर पावले उचलावी, तसेच अमंलबजावणी करिता टास्क फोर्स स्थापन करण्यात यावा असे निर्देश यावेळी ॲड. ठाकूर यांनी दिले.

## अहिल्यादेवी पुरस्कारासाठी नामांकणे सादर करावी

लातूर : महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागामार्फत महिला व बालविकास क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांना व स्वंयसेवी संस्थाकडून २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ या वर्षाकरीता इच्छुक व्यक्ती व संस्थाकडून पुरस्कारासाठी प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. राज्यस्तरीय पुरस्कार:- महिला व बाल विकास क्षेत्रात किमान २५ वर्षाचा सामाजिक कामाचा अनुभव असलेल्या महिला समाज सेवीकांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो. विभागीय पुरस्कार : महिला व बाल विकास क्षेत्रात किमान ०७ वर्षाचा सामाजिक कामाचा अनुभव असलेल्या स्वयंसेवी संस्थाना विभागीय स्तरीय पुरसकार प्रदान करण्यात येतो. जिल्हास्तरीय पुरसकार:- महिला व बाल विकास क्षेत्रात किमान १० वर्षाचा सामाजिक कामाचा अनुभव असलेल्या महिला समाज सेवीकांना राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान करण्यात येतो. प्रस्तावासोबत पूढील प्रमाणपत्रे आवश्यक राहतील. वैयक्तीक पुरस्कारासाठी- चांगले चारीद्र्य असलेबाबत व त्यांचे विरुध्द कोणताही फौजदारी तसेच सार्वजनिक संपतीचा अपहार केल्या बाबत गुन्हा दाखल नसल्याचे प्रमाणपत्र. संस्थांना दयावयाच्या पुरस्कारासाठी- संस्थेचे पदाधीकारी यांचे चांगले चारीद्र्य असलेबाबत व त्यांचेविरुध्द कोणताही फौजदारी तसेच त्यांनी सार्वजनिक संपतीचा अपहार केल्या बाबत गुन्हा दाखल नसल्याचे प्रमाणपत्र. व संस्था राजकारणापासून अलीप्त असल्याबाबतेच प्रमाणपत्र. सदरील प्रस्ताव ही बातमी प्रसीध्द झाल्यापासून दहा दिवसाच्या आत कार्यालयीन वेळेत सादर करण्याचे आवाहन जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, लातूर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी कार्यालयाच्या ०२३८२-२४८७२८ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.

## थोडक्यात वृत्तांत

### कोव्हिड-१९ प्रतिबंधक औषधांबाबत जळगाव जिल्हा प्रशासनाचे कठोर आदेश

जळगाव : कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता कोव्हीड-१९ बाबत जळगाव जिल्हाधिकाऱ्यांनी नवीन आदेश पारित केले आहेत. त्यात २२ मार्च २०२१ अन्वये खाजगी रुग्णालयांनी लक्षणे नसलेल्या किंवा सौम्य लक्षणे असलेल्या रुग्णांवर करावयाच्या वैद्यकीय उपचाराबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार होलसेल ओउशाधी डीलर्स/ ओउशाध विक्रेते यांचेकडून रेमिदेसिवीर, तोसिलीझुम्बा, इतोलीझुम्बा या औषधांचा काळाबाजार केला जात असल्याचे निदर्शनास आल्याने तो रोखण्यासाठी जिल्हाधिकारी अभिजित रूट कडक पावले उचलणार आहेत. रेमिदेसिवीर तोचील्झुम्बा, इतोलीझुम्बा या औषधांचा पुरवठा प्राधान्याने शासकीय कोविद हॉस्पिटल्स तसेच जिल्हा शल्यचिकित्सक जळगाव यांच्याकडून कोव्हिड १९ उपचारासाठी मान्यता दिलेली खाजगी हॉस्पिटल्स, परवानाधारक औषध विक्रेते व शासन मान्य वैद्यकीय व्यावसायिक यांनाच करावा तसेच मान्य नोंदणीकृत वैद्यकीय परवानाधारक डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय खाजगी व्यक्तींना रेमिदेसिअर, तोचीलीझुन्ब्झा, इतोलीझुन्बा हि इंजेक्शन उपलब्ध करून देवू नयेत असे आदेशात म्हटले आहे.

### रमाई घरकुल योजनेच्या मंजूर निधीचा तपशील तातडीने पाठवा -पालकमंत्री

लातूर : रमाई घरकुल निर्माण समितीअंतर्गत निधी मंजूर करण्यात आला असून याबाबतचा विस्तृत तपशील तातडीने पाठविण्यात यावा अशा सूचना वैद्यकीय शिक्षण मंत्री अमित देशमुख यांनी दिल्या. लातूर जिल्हा रमाई घरकुल निर्माण समितीची आढावा बैठक आज वैद्यकीय शिक्षण तथा सांस्कृतिक कार्य मंत्री अमित देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस पाणी पुरवठा व स्वच्छता राज्यमंत्री संजय बनसोडे यांच्यासह रोजगार हमी योजनेचे लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,लातूरचे समाज कल्याण अधिकारी आदी उपस्थित होते. मंत्री श्री. देशमुख म्हणाले की, राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील लोकांचे राहणीमान उंचावण्याबरोबर त्यांच्या निवाऱ्याचा प्रश्न सुटावा यासाठी ग्रामीण व शहरी भागामध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी शासनामार्फत पक्के घर बांधून देण्यात येत आहे. ग्रामीण क्षेत्रात निवड केलेल्या अनुसूचित जातीच्या लाभार्थ्यांची निवड करुन घरकुल निर्माण समिती पुनर्गठीत करण्यात आली आहे. या समितीमार्फत मंजुर कामांसाठी निधी मिळण्यासाठी पाठपुरवाही करण्यात येणार आहे. या बैठकीत सन २०१९-२० या वर्षातील शिल्लक उद्दिष्टानुसार २९१५ प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली तसेच सन २०२०-२१ मधील ६८२७ उद्दिष्टापैकी १६४५ प्रस्तावांना मंजूरी देण्यात आली.

### धनंजय भोसले यांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामसेवक पुरस्कार जाहीर

लातूर : निलंगा तालुक्यातील नणंद येथील ग्रामसेवक धनंजय रामराव भोसले यांच्या कार्याची दखल घेवून राज्य शासनाच्यावतीने त्यांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामसेवक पुरस्कार जाहीर करण्यात आला असून या पुरस्काराचे वितरण लवकरच मुंबई येथे एका कार्यक्रमात ग्रामविकास मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.सातारा जिल्ह्याच्या खटाव तालुक्यातील तांबेवाडी येथे ग्रामसेवक म्हणून सन २००४ साली भोसले हे रूजू झाले. येथे कार्यरत असताना त्यांच्याकडे डांबेवाडी, यलमरवाडी व कनसेवाडी या तीन गावांचा अतिरिक्त कार्यभार होता. सन २००७ ला भोसले यांना राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते निर्मलग्राम पुरस्कार प्रदान करण्यात आला. कनसेवाडी ग्रामपंचायत येथे भोसले यांच्याकडे कार्यभार असताना या ग्रामपंचायतला संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता पुरस्कार तत्कालीन पालकमंत्री रामराजे निंबाळकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. सन २००८-०९ ला पण राज्यपाल के. शंकर नारायण यांच्या हस्ते निर्मलग्राम पुरस्काराने भोसले यांना सन्मानीत करण्यात आले.सन २०१२ ला भोसले यांची नणंद येथे याच पदावर बदली झाली. येथील ग्रामस्थांना नागरी सुविधा पुरविण्यासह हागणदारीमुक्त गाव, ग्रामपंचायतच्या विविध करांची शंभर टक्के वसुली, गावात स्वच्छता, आरोग्य, शिक्षण आदीबाबत जनजागृती व अभियान राबविण्यात आले.

### सामाजिक कार्यकर्ते डी.एस.मोरे यांचे निधन



वाडा : रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पालघर जिल्हा संपर्क प्रमुख, सामाजिक कार्यकर्ते, आंबेडकरी व बौद्ध चळवळीतील सक्रिय जेष्ठ कार्यकर्ते- दिवंगत डी.एस.मोरे तथा दादासाहेब मोरे, रा.टोपलेपाडा, ता.विक्रमगड, यांचे मंगळवारी (दि.३० मार्च रोजी) कल्याण येथे उपचारा दरम्यान दुःखद निधन झाले आहे. पालघर जिल्ह्यातील विशेषतः विक्रमगड, जव्हार, वाडा, मोखाडा, तलासरी सारख्या दुर्गम डोंगराळ भागात गौतम बुद्ध, फुले, आंबेडकरी विचारधारा इमाने इतबारे पोहचविण्याचे काम दादासाहेबांनी केले आहे. दादासाहेब मोरे हे रामदास आठवले यांचे निकटवर्तीय होते. त्यांनी रिपाईच्या माध्यमातून गरीब, गरजूंना नेहमीच मदत व सहकार्य केले आहे, त्यांच्या जाण्याने समाजात मोठी पोकळी निर्माण झाली असल्याचे बोलले जात आहे.

## कुंभारी येथील व्यापारी गाळे राष्ट्रीय महामार्गाच्या ठेकेदाराकडून बांधून मिळावी-बिपीन करजोळे

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

सोलापूर जिल्ह्यातील दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील रोड लगत असलेल्या व्यापारी गाळे राष्ट्रीय महामार्ग विभागाने पाडले आहे चार पदरी रस्त्याला अडचण येत असल्याने ही गाळे पाडण्यात आली आहेत. त्यागाळ्यासाठी निधीही उपलब्ध करून दिली आहे, परंतु ती गाळे ग्रामपंचायत न बांधकाम करता राष्ट्रीय महामार्गाच्या ठेकेदार मार्फत बांधकाम करून द्यावी अशी मागणी दक्षिण सोलापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष बिपिन करजोळे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सोलापूर अक्कलकोट दुधनी गाणगापूर असे चारपदरी सिमेंट रस्त्याचे काम चालू आहे. त्यासाठी कुंभारी येथे ग्रामपंचायतीकडून ४२ व्यापारी गाळे बांधण्यात आले होते. त्यापैकी ३५ गाळे रस्त्याच्या कडेला आल्यामुळे राष्ट्रीय महामार्ग विभागाने पाडलेले आहेत. ३५ गाळ्यासाठी जागेपोटी ३० लाख व गाळ्यापोटी ४८ लाख असे एकूण ७८ लाख रुपये निधी भू संपादन अधिकारी यांच्याकडे जमा झालेली आहे. नवीन गाळे बांधकाम जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या जागेत बांधण्यात यावी. त्या शाळेला कंपाऊंड नाही समोर १०० गाळे बांधल्यास शाळेला ही कंपाऊंड होईल व शालेय ग्रामशिक्षण समितीचे ठराव देखील घेण्यात येणार आहे व जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागाकडे देखील मागणी करण्यात आली आहे. ८० लाख देखील गाळ्यासाठी कमी पडल्यास जिल्हा परिषद कडून उर्वरित निधी देण्याचे सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री दत्तामामा भरणे व सोलापूर जिल्हा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष बळीराम काका साठे यांनी आश्वासन दिले आहेत. १०० गाळ्याची निर्मिती झाल्यास गावातील सुशिक्षित बेरोजगारांना रोजगार मिळण्याचे साधन ठरणार आहे. या संकल्पनेप्रमाणे गाळे बांधकाम व्हावी अशी दक्षिण सोलापूर तालुका राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष बिपीन करजोळे यांनी सांगितले आहे. या पत्रकार परिषदेस सोलापूर राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष महेश माने, नितीन करजोळे, ग्रामसेवक एस.एम.ढेपे यांची उपस्थिती होती.

क्राईम Reporter
9890718873
क्राईम संध्या सप्ताहिक आता लवकरच पश्चिम महाराष्ट्रातील सातारा, सांगली, कोल्हापुर प्रत्येक सोमवारी वाचकांसाठी लवकरच आपल्या शहरातील पेपर स्टॉल वर उपलब्ध होईल.

## विकास मल्हारा यांच्या चित्राला 'आर्ट सोसायटी ऑफ इंडिया' पुरस्कार





**जळगाव/प्रतिनिधी**

येथील जैन इरिगेशनचे चित्रकार विकास मल्हारा यांना मुंबईच्या आर्ट सोसायटी ऑफ इंडिया तर्फे आयोजित १०३व्या राष्ट्रीय चित्र प्रदर्शनात रावबहादूर एम.व्ही.धुरंधर बेस्ट एक्झिबिट/ मॉर्डन पेंटींग पुरस्कार त्यांच्या अनटायटल्ड-२ या चित्राला मिळाला आहे. कोविड-१९ प्रादुर्भाव कारणाने खबरदारी म्हणून सदरील पुरस्कार वितरण सोहळा ऑनलाइन पद्धतीने संपन्न झाला. चित्रकार विकास मल्हारा यांनी मुंबईच्या प्रसिद्ध एस.एल.रहेजा स्कूल ऑफ आर्ट मधून जी.डी.आर्ट (उपयोजित) ही पदविका संपादन केली आहे. ते अमूर्त शैलीतील चित्रकार आहेत. त्यांच्या चित्रातील आकार वास्तव नसले तरी रंग, रंगलेपन, पोतातून तशी जाणीव करून देतात. त्यांची चित्रे जमिनीशी व भूतकाळातील आठवणींशी जुळलेली असतात, टेकडीवरून दिसणारे दूरपर्यंतचे निसर्ग वजा आकार चित्रात पहायला मिळतात. दूरपर्यंत पसरलेली शेती, मधूनच वाहणारे पाण्याचे झरे, दिसणारे कातळ, दिसणारी झाडे वेगवेगळ्या रंगात फुललेली दिसतात, चित्रात दिसणारे रंग, आकार आणि चित्रातला अवकाश, हा त्यांनी आपल्या चित्रातून दाखवलेला आहे. चित्रात (नाद) ध्वनी ऐकावा असे ही तरल चित्र. रंग बोलतात, आकार खेळतात आणि कॅनव्हासवर सुंदर प्रतिमा उतरते असे ते आवर्जून नमूद करतात. कवी मनाचे चित्रकार विकास यांना श्रद्धेय पद्मश्री डॉ.भवरलालजी जैन (मोठेभाऊ) यांचे नेहमी प्रोत्साहन राहिले. चित्रकार स्व.वसंत वानखेडे, प्रभाकर कोलते, वासुदेव कामत, प्रकाश वाघमारे, राज शिंगे, प्राचार्य राजेंद्र महाजन आणि राजू बाविस्कर यांचे मार्गदर्शन लाभले. सदरील प्रदर्शन ऑनलाईन दि.५ एप्रिलपर्यत आर्ट सोसायटी ऑफ इंडिया मुंबईच्या संकेत स्थळावर (http://artsocietyofindia.org/exhibition/exhibition) बघता येईल. अमूर्त शैलीत काम करणाऱ्या खान्देशातील चित्रकाराला हा सन्मान पहिल्यांदाच लाभलाय, तसेच नुकतेच त्यांच्या चित्रांची अखराबरी व्हर्च्युल इंटरनॅशनल प्रदर्शन, बांग्लादेश व टागोर इंटरनॅशनल-भोपाल साठी देखील निवड झाली. हे तिन्ही सन्मान प्राप्त झाल्याने विकास मल्हारा यांचे जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांच्यासहित कला जगतातील मान्यवरांनी तसेच कला रसिकांनी अभिनंदन केले आहे.

## भिवंडीत महामंर्गावर खुलेआम सळईचा गोरख धंदा, कोनगाव पोलिसांचे दुर्लक्ष



**भिवंडी/प्रतिनिधी**

संपूर्ण राज्यावर कोरोनाचे संकट आले असताना सामान्या नागरिकांवर अनेक बंधन घालण्यात येत असल्याने नागरिकांना जगण कठीण झाले असताना भिवंडीतील कोनगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोनू यादव याचा रात्रीच्या अंधारात खुलेआम मुंबई-नाशिक महामार्गालगत लोखंडी सळईचा खुलेआम गोरख धंदा सुरु असताना पोलिसांचे मात्र दुर्लक्ष होत असल्याने एका सामाजिक कार्यकर्त्याने ठाणे पोलीस आयुक्ताकडे लेखी तक्रार केली आहे. राज्यावर आणि ठाणे जिल्ह्यावर कोरोना सारख्या महामारीचे मोठे संकट आले असताना त्यात नागरिकांचा रोजगार बुडाल्याने उपासमारीची वेळ सर्वसामान्य नागरिकांवर आली आहे. तर प्रशासनाची मुख्य जबाबदारी पोलिस विभागावर आहे. पोलीस विभाग रात्रंदिवस मेहनत करून या आलेल्या संकटावर मात करत आहे. मात्र भिवंडीतील कोनगाव पोलीस ठाणे याला अपवाद आहे. कोनगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत मुंबई-नाशिक महामार्गालगत रांजनोली इथं टाटा आमंत्रण बिल्डिंगच्या जवळ तसेच गोवे येथील एमआयडीसी त्याच प्रमाणे कोनगाव पोलीस ठाण्याच्या बाजूला तर बबुशा इंडस्ट्रियल पार्क इथं आणि मुंबई नाशिक महामार्गावरील ओम साई वजन काटा, अशा पाच विविध ठिकाणी मोनू यादव हा खुलेआम कंटेनर ट्रेलर तसेच १२ टायरवाल्या मोठ्या गाड्यांमधून सळई तस्करी करून गोरख धंदा करत आहे. हा धंदा सरळ सरळ चोरीचा असून चालकाला मॅनेज करून लोखंडी सळईचा माल उतरवला जातो आणि तो दुसऱ्या मार्गाने विकला जात असून मोनू यादव याच्या विरुद्ध अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. तरीही कोनगाव पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक गणपतराव पिंगळे यांचे जाणीवपूर्वक दुर्लक्ष असल्यामुळे यादव याचा खुलेआम सळईचा गोरख धंदा सुरु असून या सळईच्या वाहनांमुळे अपघाताच्या घटनाही घडल्या असल्याने मोनू यादवचा गोरख धंदा तात्काळ बंद करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्त्यांनी ठाणे पोलीस आयुक्त यांच्याकडे केली आहे.

05 TO 11 APRIL 2021 - Page 8 (CRIME SANDHYA):Layout 1 03/04/2021 8:27 PM Page 1



# वीजबिलांची दुरुस्ती करा अन्यथा आंदोलन!

## आमदार संभाजी पाटील निलंगेकरांचा इशारा



**लातूर/प्रतिनिधी**

कोरोनाच्या संसर्गाने समाजातील सर्व घटकांना मोठ्या आर्थिक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या परिस्थितीतच महावितरणने कोरोना काळात अव्वाच्या सव्वा वाढीव वीजबिले शेतकरी व ग्राहकांच्या माथी मारली आहेत. ही वीजबिले दुरुस्त करून ग्राहकांना दिलासा द्यावा, अशी मागणी सातत्याने होत आहे. मात्र याकडे सपशेल दुर्लक्ष करत महावसुलीत गुंग असलेल्या आघाडी सरकारने शेतकर्यांसह जनतेची घोर फसवणूक केली आहे. त्याचा निषेध म्हणूनच माजी पालकमंत्री आ. संभाजी पाटील निलंगेकर यांनी वाढीव वीज बिलांची होळी करण्याचे आवाहन केले होते. या आवाहानाला प्रतिसाद देत होळी पोर्णिमेदिवशी जिल्हाभरात वीज बिलांची होळीकरून महावसुली सरकारच्या नावाने बोंबा मारण्यात आल्या. निलंग्यात आ. निलंगेकरांनी वीज बिलांची होळी करून १५ दिवसांत वीजबिले कमी करून दुरुस्ती न केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा दिला आहे. कोरोनाच्या लॉकडाऊन काळात अनेक महिने दुकाने व विविध उद्योग व्यवसाय ठप्प होती. त्यामुळे अनेकांना मोठ्या आर्थिक अडचणीला तोंड द्यावे लागले आहे. या लॉकडाऊन काळातच वीज मंडळाने चुकीची आणि भरमसाठ बिले शेतकर्यांसह ग्राहकांच्या माथी मारली आहेत. आधीच अडचणीत सापडलेल्या सर्व समाजघटकांचे या वाढील वीजबिलामुळे आर्थिक कंबरडेच मोडले आहे. लाखो रुपयांची बिले देऊन त्याची सक्तीने महावसुली सरकारकडून करण्यात येत आहे. विशेष म्हणजे याबाबत जिल्ह्यासह राज्यभरातील अनेक वीज ग्राहकांनी असंतोष व्यक्त करून ही बिले दुरुस्त करून देण्याची मागणी केली होती. ही मागणी लावून धरत अर्थसंकल्पीय अधिवेशनात भाजपाने प्रश्न उपस्थित करून आवाज उठविला होता. त्यावर उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी वीज बिलांची दुरुस्ती केल्यानंतरच वसुली करण्यात येईल, तोपर्यंत तोडणीला स्थगिती देण्याचा निर्णय घेतला होता. मात्र अधिवेशनाच्या शेवटच्या दिवशी युटर्न घेत पुन्हा एकदा आघाडी सरकारकडून वीजबिलांची महावसुली करण्यात येत आहे. विशेषतः शेतकऱ्यांना तर या वीजतोडणीमुळे मोठ्या ...पान ६ वर

## पालघर जिल्ह्यात ९१ हजार ५६१ जणांचे कोव्हिड लसीकरण

# लस सुरक्षित सर्वांनी लसीकरण करून घ्यावे-डॉ.माणिक गुरसळ




**पालघर/प्रतिनिधी**

कोव्हिड-१९ प्रादुर्भाव रोखण्यासाठी जिल्ह्यामध्ये पालघर ग्रामीण तसेच वसई- विरार महानगरपालीका क्षेत्रामधील आरोग्य कर्मचारी, पहिल्या फळीमध्ये काम करणारे कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक व्याधी असलेल्या व्यक्तीसह ७५ हजार ७२८ जणांना लसीकरणाचा पहिला डोस देण्यात आला असून १५ हजार ८३३ व्यक्तींना दुसरा डोस देण्यात आला आहे. असे एकुण जिल्ह्यामध्ये ९१ हजार ५६१ व्यक्तींना कोव्हिड-१९ लसीकरण करण्यात आले आहे. हे लसीकरण पुर्णपणे सुरक्षित असून नागरिकांनी लसीकरण करून घ्यावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांनी केले. कोव्हिशिल्ड आणि कोव्हॅक्सिन या लस जिल्ह्यामध्ये उपलब्ध आहेत. लसीकरण केंद्राची संख्या ६१ असून त्यामध्ये पालघर ग्रामीण येथे ३२ शासकीय लसीकरण केंद्र तर ५ खाजगी लसीकरण केंद्र आहेत तसेच वसई विरार महानगरपालिका क्षेत्रामध्ये १४ शासकीय तर १० खाजगी लसीकरण केंद्र स्थापन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांनी दिली. १ मार्च ते २८ मार्च दरम्यान जिल्ह्यामध्ये ३६७७ नविन कोरोना पॉझीटीव्ह रुग्णांची नोंद झाली असून या कालावधीमध्ये १८ रुग्णांचा मृत्यू झाल्याचे जिल्हाधिकारी डॉ. माणिक गुरसळ यांनी सांगितले.

# महिला सुरक्षा जनजागर व राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदनियुक्त्या



**वाडा/प्रतिनिधी**

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन अंभई येथे महिला सुरक्षा जनजागर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला आघाडीच्या विविध पदनियुक्त्या करण्यात आल्या. वनिता देशमुख (पालघर जिल्हा महिला सरचिटणीस), अक्षता चौधरी (वाडा तालुका महिला कार्याध्यक्ष) रोहिणी शेलार (वाडा तालुका महिला सरचिटणीस), प्रतिभा वेखंडे (वाडा तालुका महिला उपाध्यक्ष), वैशाली म्हसरा (वाडा तालुका महिला उपाध्यक्ष), विजया जाधव (सल्लागार), दिपाली गोतारणे (वाडा शहर महिला उपाध्यक्ष), दर्शना तरे (वाडा शहर महिला उपाध्यक्ष), रूपाली तरे (वाडा शहर महिला सरचिटणीस), रंजना वाघ (वाडा शहर महिला सचिव) आदी पदनियुक्त्या करण्यात आल्या. तसेच यावेळी महिला जिल्हाध्यक्षा किर्ती मेहता यांच्या माध्यमातून महिलांसाठी ५०० सॅनिटरी नॅपकिन व मास्क तालुका अध्यक्ष मृणाली नडगे व वाडा शहराध्यक्षा अश्विनी भोईर यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पालघर जिल्हा निरिक्षिका सुनिता देशमुख होत्या तर प्रमुख अतिथी म्हणून राज्य कार्यकारीणी सदस्या निलम राऊत, महिला जिल्हाध्यक्षा किर्ती मेहता, नवी मुंबई जिल्हा सरचिटणीस निर्मला लटांबळे, डहाणू महिला तालुकाध्यक्ष सुमन राबड, विक्रमगड शहराध्यक्षा संजना बेंडकोळी, वाडा नगरपंचायत बांधकाम सभापती सुचिता पाटील, वाडा तालुका उपाध्यक्ष सुदर्शन पाटील आदी उपस्थिती होते.यावेळी अँड.दिलीप जयराम पष्टे यांनी महिला कायदेविषयक सल्ले यावर सखोल मार्गदर्शन केले. हा संपूर्ण कार्यक्रम कोव्हीड-१९ संदर्भातील सर्व नियमांचे पालन करून साजरा करण्यात आला. सदर कार्यक्रमासाठी पालघर जिल्हा ओ.बी.सी सेलचे अध्यक्ष नरेश आकरे यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# भिवंडीत मुला-मुलींच्या वसतीगृहास भीषण आग

## अडकलेल्या ७४ विद्यार्थ्यांची सुखरूप सुटका



**भिवंडी/आकाश गायकवाड**

भिवंडी तालुक्यात आग लागण्याच्या घटना वारंवार घडत असतांनाच भिवंडी नाशिक महामार्गावर असलेल्या सोनाळे ग्राम पंचायत हद्दीतील मुलामुलींच्या वसतीगृहास भीषण आग लावल्याची घटना सोमवारी रात्री घडली आहे. वसतीगृहाला लागलेल्या आगीमुळे येथील ७४ विद्यार्थी अडकून पडले होते, सुदैवाने या सर्व विद्यार्थ्यांना अग्निशमन दल व स्थानिकांच्या अथक प्रयत्नाने सुखरूप बाहेर काढल्याने मोठा अनर्थ टळला आहे, मात्र आगीचे नेमकी कारण अजून समजू शकले नसले तरी शॉर्ट सर्किटने हि आग लागली असल्याचा अंदाज वर्तविण्यात येत आहे. मुंबई-नाशिक महामार्गावरील भिवंडी तालुक्यातील सोनाळे ग्रामपंचायत हद्दीत अरहम लॉजिस्टिक कॉम्प्लेक्स या ठिकाणी एका इमारतीमध्ये ईडीयु लाईट या संस्थेचे दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य केंद्र असून या ठिकाणी सोमवारी रात्री आठ वाजताच्या दरम्यान अचानक आग लागली . पाहता पाहता हि आग दुसऱ्या मजल्यावरील वसतिगृहा पर्यत पोहचली. इमारतीत धूर पसरल्याने वसतीगृहातील विद्यार्थ्यांनी टेरेसचा आसरा घेतला त्यानंतर आलेल्या भिवंडी अग्निशामक दलाच्या जवानांनी विद्यार्थ्यांना बाहेर काढण्यास स्थानिकांच्या मदतीने प्रयत्न केला. या वसतिगृहात सध्या ७४ प्रशिक्षणार्थी असून त्यापैकी ३० मुली असून हे सर्व प्रशिक्षणार्थी वेगवेगळ्या जिल्ह्यातील असून त्यांना या ठिकाणी कॉल सेंटर एक्झिकेटीव्ह व डाटा इन्ट्रीचे तीन महिन्याचे ...पान ६ वर

# लक्ष्मण पवार यांना राज्यस्तरीय आदर्श ग्राम सेवक पुरस्कार प्रदान



**देवणी/प्रतिनिधी**

तालुक्यातील अंबानगर येथील रहिवासी, जीवन शिक्षण विद्यालय वडमुरंबीचे माजी विद्यार्थी तथा सिंधुदुर्ग जिल्ह्यातील दोडामार्ग तालुक्यातील विर्डी ग्रामपंचायतीचे कार्यरत असलेले ग्रामसेवक लक्ष्मण नरसिंगराव पवार यांना राज्य शासनाकडून देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श ग्रामसेवक पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभागाच्या वतीने ग्रामीण भागामध्ये सर्वोत्कृष्ट काम करणाऱ्या ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी यांना राज्यस्तरीय आदर्श ग्रामसेवक,ग्रामविकास अधिकारी म्हणून यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीदिनी सन्मान केला जातो. लक्ष्मण पवार यांनी गेली ८ वर्षे सेवा कालखंडात त्यांनी नाविन्यपूर्ण उपक्रम ग्रामपंचायत पातळीवर राबविले त्यात त्यांनी ग्रामपंचायतीला पुढील पुरस्कार मिळवून दिले. तालुका स्मार्ट ग्राम, जिल्हा स्मार्ट ग्राम, पर्यावरण विकासरत्न, महात्मा गांधी तंटामुक्त गाव, गौरव ग्रामसभा, स्वच्छ व सुंदर ग्रामपंचायत अभियानात तालुकास्तर द्वितीय क्रमांक, तालुक्यातील पहिली पेपरलेस ग्रामपंचायत,जिल्हा परिषद आदर्श ग्रामसेवक पुरस्कार, संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान जिल्हा परिषद प्रभागात प्रथम सलग दोन वर्षे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना मनुष्यदिन निर्मिती मध्ये तालुक्यात सलग ८ वर्षे प्रथम व द्वितीय क्रमांक, हागणदारीमुक्त गाव, खडज मानांकन ग्रामपंचायत,डिजिटल अंगणवाडी, पर्यावरण संतुलित समृद्ध ग्राम योजना, निर्मल ग्राम पुरस्कार, लोकराज्य ग्राम, फरा प्रतिष्ठित आदर्श गाव केर भेकुर्ली यांजकडून आदर्श ग्रामसेवा पुरस्कार प्राप्त, अभ्यास सहली ...पान ६ वर

# शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या वर्धा ड्रायव्हर्शन सिंचन प्रकल्पाला १ हजार १०९ कोटी २३ लक्ष रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता



**वरुड/प्रतिनिधी**

मोर्शी विधानसभा मतदार संघात समाविष्ट असलेल्या वरुड मोर्शी तालुक्यातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्णत्वास नेने, बंदिस्त पाईप लाईनद्वारे शेतकऱ्यांच्या बांधावर पूर्ण पाणी देऊन सिंचनाची सोय उपलब्ध करणे, संत्रा पिकाची लागवड मोठ्या प्रमाणात असल्यामुळे प्रकल्पावर बंदिस्त नलिका वितरण प्रणालीची कामे व सिंचन क्षेत्रात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यासाठी व रखडलेले सिंचन प्रकल्प पूर्णत्वास नेण्यासाठी मोर्शी विधानसभा मतदार संघाचे आमदार देवेंद्र भुयार यांनी माजी कृषी मंत्री तथा शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली वरुड मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या सिंचनाच्या समस्या मिटविण्यासाठी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, जल संपदा मंत्री जयंत पाटील यांच्याकडे सतत पाठपुरावा करून वरुड मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणाऱ्या पंढरी मध्यम वर्धा ड्राय व्हर्शन प्रकल्प पूर्णत्वास नेण्याकरिता १ हजार १०९ कोटी २३ लक्ष रुपयांची सुधारित प्रशासकीय मान्यता २४ मार्च रोजी झालेल्या मंत्री मंडळाच्या बैठकीमध्ये मिळवून दिल्याबद्दल वरुड मोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

अमरावती जिल्ह्यात सिंचनाखालील सर्वात मोठे क्षेत्र वरुड मोर्शी तालुक्यात आहे. संत्रा बेल्ट म्हणून या परिसराची जगात ख्याती आहे. संत्रा टिकविण्याकरिता आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली निघावा म्हणून सुपर एक्सप्रेस वर्धा डायव्हर्शन कॅनल दहा वर्षापासून पासून या प्रकल्पाचे काम रखडले होते. शेतकऱ्यांसाठी वरदान ठरणारा वर्धा डायव्हर्शन प्रकल्पाला राजाश्रय मिळन्याच्या प्रतीक्षेत शेतकरी होते. वरुड तालुक्यातील भूजल पातळी अतिउपस्यामुळे १२०० फुट खोलीवर गेली. पिण्याच्या पाण्यासह सिंचनाचा प्रश्न निर्माण झाल्याने संत्रा उत्पादक शेतकरी जलसंकटाने त्रस्त होऊन संत्राबागा सुकू लागल्याने विदर्भाचा कॅलीफोर्निया वाळवंट होण्याच्या मार्गावर आहे . यातच भूजल खात्याने डार्क झोन म्हणून तालूक्यातील पाण्याची पातळी गत १० ते १५ वर्षापासून खोलवर गेल्याने व संत्राबागा व पिण्याच्या पाण्याची सोय व्हावी म्हणून वरुड तालुक्यातील नद्या बारमाही वाहत्या करण्याकरिता मोर्शी ...पान ६ वर

# लातूर शहर अस्वच्छतेच्या विळख्यात!

## मनपाला जागे करण्यासाठी नगरसेवक कव्हेकर यांची नाली सफाईतून गांधीगिरी

**लातूर/प्रतिनिधी**

शहरातील स्वच्छतेचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे. याबाबत महापौराकडे चर्चा करूनही स्वच्छतेचा प्रश्न पूर्णपणे मार्गी लागत नाही. लातूर महानगरपालिकेमध्ये भाजपाची सत्ता असताना शहरातील नाली स्वच्छते चा विषय मार्गी लावण्यासाठी प्रत्येक प्रभागात पंधरा ते वीस जणांची टिम पूर्णवेळ होती व त्याला सपोर्ट करण्यासाठी ७० जणांची अतिरिक्त टिम करण्यात आली होती जी टीम महिन्यातून प्रत्येक प्रभागात एक दोन वेळेस जाऊन हमला पद्धतीने नाल्या साफ करत असत. परंतु आता मात्र, केवळ पंधरा ते २० कर्मचाऱ्यांवर प्रत्येक वार्डातील पूर्ण स्वच्छतेची जबाबदारी टाकण्यात आलेली आहे. त्यातील अर्धे कर्मचारी गैरहजर राहतात. त्यामुळे आहे त्या कर्मचार्यावर अतिरिक्त कामाचा ताण पडत आहे. त्यामुळे शहरातील स्वच्छतेचा प्रश्न मार्गी लागत नाही. परिणामी शहरात जागोजागी नाल्या तुंबल्या असल्याचे चित्र दिसून येत आहे. ही बाब लक्षात घेवून महापौराकडे विषय न मांडता भाजपा युवा नेते तथा नगरसेवक अजितसिंह पाटील कव्हेकर यांनी गांधीगिरी ...पान ६ वर






# सामाजिक कार्यकर्ते रोहिदास शेलार यांची शाळेच्या अध्यक्षपदी नियुक्ती!



**वाडा/प्रतिनिधी**

पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ भिवंडी या संस्थेच्या परळी माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेच्या अध्यक्षपदी सामाजिक कार्यकर्ते रोहिदास शेलार यांची नियुक्ती करण्यात आली आहे. पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ संस्थेच्या परळी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळेत शुक्रवारी (दि.२ एप्रिल) झालेल्या बैठकीत संस्थेचे अध्यक्ष विजय जाधव यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले. या प्रसंगी विविध संस्थेचे पदाधिकारी सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. विकासात्मक दृष्टिकोन समोर ठेवून शाळेची वाटचाल पुढे नेण्यास सर्वतोपरी प्रयत्न करणार असून या शाळेला नावलौकिक मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मत यावेळीं रोहीदास शेलार यांनी यावेळी केले. शेलार यांच्या निवडीने परळी विभागात विद्यार्थी आणि नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.